पवित्र कुरआन गैरसमजुतींचे निवारण

लेखक

सनाउल्लाह

अनुवाद

अ. ह. अन्सारी

अनुक्रमणिका

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे"

प्रस्तावना

दिव्य कुरआन हा ईशग्रंथांत अंतिम ग्रंथ असून साऱ्या ईशग्रंथांचा संरक्ष (त्यांच्या शिकवणीला आपल्यात समाविष्ट करणारा) आहे. यापूर्वी अनेक ईशग्र जगाच्या विभिन्न भागांत आणि विविध कालावधित अवतरित झाले आहेत. मनुष्याच हाताने व काळाच्या पडद्याआड विकृत होऊन नष्ट झाले आहेत. त्या साऱ्या ग्रंथा पुनर्जीवन व स्थायित्त्व प्रदान करण्यासाठी पवित्र कुरआन अवतरित झाले. पूर्वींचे स ईशग्रंथ त्या त्या काळच्या पैगंबरांवर एक प्रतिष्ठित देवदूत जिब्रिल (अ.) द्वा अवतरित झाले. हा एक विश्वसनीय देवदूत ईश्वराचे संदेश मानवापर्यंत आणण्यासा ईशआदेशान्वये नियुक्त आहे. अंतिम पैगंबर मुहम्मद (स.) चाळीस वर्ष वया असताना मक्का शहरात दिव्य कुरआन अवतरित व्हायला सुरवात झाली. अवतरण स्थिती अशी असायची की देवदूत जिब्रिल (अ.) मानवरूप धारण करून पैगं मुहम्मद (स.) समोर प्रकट होत आणि ईशवाणी त्यांच्यासमोर म्हणत असत. कधी त प्रकट न होताच परोक्षरुपाने ईशवाणी म्हणत. स्पष्ट आवाज आणि संकेत ओळखू पैगंबर मुहम्मद (स.) ते संदेश ग्रहण करीत. त्याचवेळी पैगंबर (स.) ते पाठ करून घे व तात्काळ अनुयायींना बोलावून त्यांना लिहून घेण्यास सांगत.

या प्रकारे पवित्र कुरआनचे लहान लहान अंश वेळोवेळी अवतरित होत राहिले पाठांतर व लेखणीद्वारा एकत्रित होत राहिले. हे अवतरण एक ओजस्वी भाषणाच स्वरूपात होत होते. लोकांसमोर ईशआवाहन म्हणून ऐकविले जात व रोज प्रार्थने (नमाजात) वाचले जात. याप्रकारे त्याचा प्रचार व प्रसार झपाट्याने होऊ लागला. त वेळचे सर्व अनुयायी (मुस्लिम) या कार्यात हिरीरीने भाग घेत असत.

मुहम्मद (स.) यांच्या वयाच्या ६३ व्या वर्षापर्यंत याप्रकारे कुरआनच्या लहान मोठ्या 'आयती' अवतरित होत राहिल्या. याप्रकारे पवित्र कुरआन अवतरित होण्याच कालावधी २३ वर्षांचा होतो. पैगंबर (स.) कुरआनच्या आयती (निशाणी, ओळ श्लोक, वाक्य इ. अर्थाने) लोकांसमोर पठण करीत. त्यातील गूढ शब्दांचे अर्थ व्याख्या करीत. त्यातील शिकवणीनुसार आचरण करून व्यावहारिक नमुना व आद लोकांसमोर ठेवीत. कोणताही असा आदेश पवित्र कुरआनचा नसेल ज्यावर आचर केले गेले नाही.

पवित्र कुरआनच्या 'आयती' विशिष्ट परिस्थितीत अवतरित होत असत. वतरणाच्या क्रमानुसार पवित्र कुरआनमध्ये लिपीबद्ध करणे उपयोगी नव्हते, ायीस्कर नव्हते. त्यात क्रमवार व सुव्यवस्था स्थापित करण्यासाठी ईशआदेशानुसार ांबर मुहम्मद (स.) स्वत: या आयतींचे ठिकाण निश्चित करीत असत. जेव्हा ापिकाद्वारे आयती लिहून घेत तेव्हा हेही आदेश देत की कोणत्या आयती पुढे अथवा ोणत्या आयतीनंतर रचना पूर्ण करावयाची आहे. या प्रकारे क्रमवार आयतींमुळे रआन पूर्ण झाले आणि त्याच क्रमानुसार वाचन, पठण व स्मरण करण्याची प्रथा रूढ ाली.

पवित्र कुरआन सुरुवातीच्या काळापासून ज्या लिपींत लिहिले गेले त्याच लिपीत ातापर्यंत लिहिणे हेच आदर्श स्थापित झाले आहे. अक्षरांची सजावट, सुंदर व देखणे नविण्याची कला नंतर अस्तित्त्वात आली. परंतु अक्षरजोडणी आणि उच्चारणासाठी ाचीन पद्धतच अवलंबिली गेली.

जगात कोणत्याही भाषेच्या शैलीत व शब्दार्थांत शेकडो वर्षांनंतर परिवर्तन होणे ंभव आहे. परंतु पवित्र कुरआनचा दैनंदिन जीवनाशी संबंध असल्याकारणाने अरबी ाषेत स्थैर्य आणि नियंत्रण आलेले आहे. तरी पण लिपी आणि उच्चारणामध्ये पूर्ण थैर्य प्राप्त होऊनही अर्थविस्तार आणि अर्थ संकोच प्रभावित होणे स्वभाविक आहे. या डचणीवर मात करण्यासाठी, अरबीपासून इतर भाषांमध्ये शिकवणीचा विस्तार रण्यासाठी प्रत्येक युगात त्याचे सविस्तर भाष्य (तफसीरें) लिहिली गेली. त्यांच्या दतीशिवाय पवित्र कुरआनची शास्त्रीय भाषा व शैलीचा आनंद लुटणे तर दूर भावार्थ मजणेसुद्धा मोठे कठीण कार्य आहे. सर्व प्राचीन व शास्त्रीय ग्रंथांना ही समस्या समान पाने लागू पडते. एखादा मुस्लिमेतर काय पण साधारण ज्ञान असलेला मुस्लिमसुद्धा ुरआनचे अध्ययन करताना बऱ्याच ठिकाणी गोंधळून जातो. यामुळे काही स्वभाविक श्न उभे राहतात. याचबरोबर काही माणसे अशीही असतात जी आक्षेप लावण्यात व ुटी काढण्याकरिताच पुस्तकाचे अध्ययन करतात. म्हणून भ्रमित होण्याची संभावना धिक असते. जगात अधिकारपणे हे स्वीकृत केले जाते की, पवित्र कुरआनद्वारा स्तावित "इस्लाम धर्म" एक सुनियोजित सशक्त व्यवस्थेचे नाव आहे. याच्या तुलनेत ुसरी व्यवस्था व विधान ठेवले जाऊ शकत नाही. तरीपण भ्रम निर्माण करणाऱ्या आरोप व आक्षेप यांची साखळी काही तुटत नाही. कदाचित ही त्यांची विवशता आहे की त्यांनी असेच करावे. परंतु त्यांच्या भ्रमजाळ्यात अडकणाऱ्यांची ही जबाबदारी आहे

की मोकळ्या मनाने व डोक्याने, पूर्वाग्रह न बाळगता पवित्र कुरआनचे अध्ययन करा याची शिकवण इतकी सरळ व सुबोध आहे की साधारण व्यक्तीसुद्धा आकर्षित हो मन मोहित होते. फारच थोडी ठिकाणे आहेत जिथे काही समस्या येतील कार कृपाळू अल्लाहने सर्वसाधारण समज असणाऱ्यासाठीच याला सरळ आणि सुबो बनविले आहे. कोणीही मनुष्यप्राणी त्याच्या कृपेपासून कसा वंचित राहू शकत याबाबतची घोषणा पवित्र कुरआन स्वत:च करतो.

"आणि या कुरआनला उपदेशासाठी सुलभ साधन बनविले आहे. मग अ काय कोणी उपदेश घेणारा?" *(दिव्य कुरआन, ५४ : १७, २२, ३२, ४०*

पवित्र कुरआनाचे अध्ययन करताना जागोजागी जी शंका येते, ज्या अडचण येतात, या सर्वांचे निरसन करण्यासाठी तसदी घेणे हे व्यापक कार्य आहे. यासाठी उच प्रतीचे भाष्य-ग्रंथ (तफसीर) वाचले पाहिजे. अध्ययन व मनन केले पाहिजे. पुस्तकात आम्ही निवडक व ठळक अशा आक्षेपांना घेतले आहे, की ज्यामुळे मू अस्तित्त्वालाच धोका पोहोचतो. या आक्षेपांची उत्तरे, शंकांचे निरसनसुद्धा अत्यं संक्षिप्त स्वरूपात प्रस्तुत करण्याचे प्रयत्न केले आहेत. याचे कारण असे की आजच्य व्यस्त जगात विचारशील पुस्तके वाचण्यासाठी फार थोडे लोकच वेळ काढतात त्यावर रक्कम खर्च करणेही पसंत करीत नाहीत.

आशा बाळगतो की, संक्षिप्त व साधारण प्रयत्नाने शंकानिरसन करून मद मिळेल आणि अधिक अभ्यास करण्याची, जाणून घेण्याची प्रेरणा प्राप्त होईल. ह पुस्तिका अशाच जिज्ञासूंकरिता लिहिली गेली आहे. आमच्या संकल्पात थोडी ज सफलता प्राप्त झाली तर आमचे परिश्रम सार्थक होईल.

शेवटी दयावान ईश्वरापाशी प्रार्थना आहे की पवित्र कुरआनच्या मार्गदर्शनासंबंध अडचणी आणि भ्रम दूर करण्यासाठी या तुच्छ प्रयासात सफलता लाभो.

आमीन!

सनाउल्लाह "सुमन"
नई दिल्ली

कुरआन ईशग्रंथ आहे काय?

शंका : कुरआन अल्लाहकडून अवतरित ग्रंथ नाही तर पैगंबर मुहम्मद (स.) यांची रचना आहे!

पवित्र कुरआनबाबत सर्व मुस्लिमांची श्रद्धा व विश्वास आहे की हा अल्लाहद्वारा अवतरित ग्रंथ आहे. हे एक मोठे जाहीर प्रतिपादन होय. आम्हाला याची समीक्षा करावी लागेल की हे जाहीर विधान तर्कावर आणि प्रमाणावर आधारित आहे अथवा श्रद्धेवर आधारित व प्रभावित होऊन कोऱ्या कल्पनेवर आहे? अधिकांश धर्मांत निष्ठा व विश्वासाचे कल्पना विलास हे बिनबुडाचे असतात ज्यांच्यामागे काही प्रमाण नाही. यामुळे इतक्या मोठ्या विधानाची तर्कपूर्ण समीक्षा करणे आणि त्यांच्या पक्ष विपक्षात दिल्या जाणाऱ्या प्रमाणाची चाचणी करणे अत्यावश्यक आहे.

कोणत्याही विधानाला सिद्ध करण्यासाठी दोन प्रकारच्या साक्षींची अथवा प्रमाणांची गरज भासते. विधानाला सिद्ध करण्यासाठी एक बाहेरील प्रमाण ज्याला 'बाह्यसाक्ष' म्हणतात आणि दूसरे प्रमाण त्या विधानांतील अंतर्गत लक्षण त्यास 'अंत:साक्ष' म्हटले जाते. या दोन्ही प्रमाणांशिवाय ऐतिहासिक निरंतरतालासुद्धा सहाय्यक प्रमाण मानले जाते. वरील तिन्ही प्रकारच्या प्रमाणांची समीक्षा येथे प्रस्तुत करण्यात येत आहे.

(क) बाह्यसाक्ष

१) पैगंबर (स.) यांची ग्वाही - बाहेरील साक्ष आणि प्रमाणात प्रथम आणि प्रमुख प्रमाण पैगंबरांची ही ग्वाही की त्यांच्याजवळ देवदूत येऊन सांगतो, ही अल्लाहची वाणी आहे जी तुमच्यावर अवतरित केली जात आहे कारण या ज्ञानाचा प्रसार सर्व लोकांपर्यंत व्हावा.

"यांना सांगा, त्याला तर पवित्र आत्म्याने ठीक ठीक माझ्या पालनकर्त्याकडून क्रमश: अवतिर्ण केले आहे." *(दिव्य कुरआन - १६ : १०२)*

"पूर्वीच्या पैगंबरांना देखील आम्ही उज्ज्वल संकेत व ग्रंथ देऊन पाठविले होते आणि आता हे पुन:स्मरण तुमच्यावर अवतरले आहे की जेणेकरून तुम्ही लोकांच्या समोर त्या शिक्षणाचे स्पष्टीकरण करीत रहावे. त्यांच्यासाठी अवतरले आहे

आणि लोका (स्वत:) देखील गांभिर्याने विचार करतील.''

(दिव्य कुरआन - १६ : ४४)

''या कुरआनला आम्ही सत्यनिशी उतरविले आहे आणि सत्यानिशीच हा अवतरला आहे आणि हे पैगंबर (स.)! तुम्हाला आम्ही या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामाकरिता पाठविले नाही की (जो मान्य करील त्याला) शुभवार्ता द्या आणि (जो मान्य करणार नाही त्याला) ताकीद द्या.'' *(दिव्य कुरआन - १७ : १०५)*

या आयती कुरआनच्या अंत:साक्षीतला भाग आहेत. याचबरोबर विधान करून पैगंबर मुहम्मद (स.) यांनी काम सुरु केले आणि ही गोष्ट इस्लामच्या मूळ धारणेत आहे.

या अवतरित आयतींना पाठ करून पैगंबरांनी स्वयं त्या आदेशाचे पालन केले व अन्य लोकांपर्यंत संदेश पोहोचविला.

पैगंबर मुहम्मद (स.) यांचे निष्कपट आचरण, पवित्रता, निस्वार्थीपणा आणि सचोटी पाहता त्यांच्या ग्वाहीवर विश्वास ठेवला गेला.

''तसे पाहिले तर मी यापूर्वी तुमच्यातच आयुष्य व्यतीत केले आहे. तुम्ही बुद्धीचा उपयोग करीत नाही काय? (अर्थात माझे आचरण जाणता, सत्य निष्ठेची ग्वाही देतात तरी पण खोटे ठरवतात?) मग त्याच्यापेक्षा मोठा अत्याचारी अन्य कोण असेल जो एक असत्य गोष्ट रचून अल्लाहशी तिचा संबंध जोडील अथवा अल्लाहच्या सत्य संकेतांना खोटे ठरवील. नि:संशय गुन्हेगार कधीच सफल होऊ शकत नाहीत.''

(दिव्य कुरआन - १० : १६-१७)

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याकडून ईशज्ञान लोकांना आकर्षित करीत असे, त्याचबरोबर त्यांचा व्यक्तिगत स्वभाव, सार्वजनिक सेवा, मानव-प्रेम, करूणा, सत्यनिष्ठा इत्यादी चारित्रिक गुणांनी लगेचच लोकांच्या मनावर ताबा मिळविला होता. निर्विवादपणे त्यांना समाजातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणून मान्यता प्राप्त झाली होती. त्यांच्या विद्वत्तेबाबत सगळ्यांना खात्री होती. परंतु कुरआनच्या शिकवणीमुळे त्यांच्या परंपरागत सामाजिक व्यवस्थेला ठेच लागत असे. याच कारणास्तव समाजातील प्रतिष्ठित मोठ्या लोकांनी विरोध केला आणि दरिद्री व पीडित लोकांनी पुढे येऊन स्वीकार केला. हळूहळू खोटेपणाच्या गोष्टींवर सत्याच्या साबणाने धुलाई केली व

थोड्याच वेळात समाजाने स्वच्छ व शुभ्र रूप धारण केले. लोक लांबलांबच्या अंतरावरून तुकड्या-तुकड्यांनी येऊन इस्लामची शिकवण आत्मसात करू लागले.

संकटाच्या स्थितीतसुद्धा असत्य व मिथ्याने न वागणारे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याबाबत ही कल्पनाही करवत नाही की, ते अल्लाहबाबत एवढे मोठे खोटे बोलून धोका देणार? असा खोटारडेपणा स्वार्थी माणूसच करू शकतो, व हा खोटारडेपणा जास्त काळ टिकू शकत नाही. अल्लाहच्या नावाने प्रस्तुत केलेले पुस्तकच स्वयं याचा खोटारडेपणा उघड करेल. साऱ्या दुनियेचा लाभ, जातीय लाभ, सुख शांतीचा लाभ, साऱ्या मानवांत समानता व बंधुभाव पसरविणाऱ्या पैगंबरांच्या आचरणांत अशा घृणित खोटारडेपणाचा लवलेश असूच शकत नाही. पैगंबरांच्या जीवनाची पारख केल्यानंतर शंकांचे निरसन आपोआप होते.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सचोटीबाबत, त्यांच्या परीक्षेसाठी त्या काळच्या लोकांना संधी होती, तीच संधी नंतरच्या काळातील लोकांसाठीही आहे. पैगंबरांच्या जीवनातील सर्वच्या सर्व गोष्टी, त्यांचे आचरण, शिकवणच काय तर त्यांचे उठणे, बसणे, झोपणे, खान-पान, चलत-फिरत यासारख्या साध्या-साध्या बाबींबाबतची माहिती (घराच्या बाहेर पर्यंत) इतिहासाच्या पानांत सप्रमाण सुरक्षित आहे. हे एक ऐतिहासिक सत्य आहे की आजपर्यंत पैगंबर मुहम्मद (स.) यांच्याशिवाय जगातील कोणत्याही महापुरुषाच्या व्यक्तिगत जीवनकाळातील प्रत्येक पैलूबाबत सप्रमाण माहिती उपलब्ध नाही.

२) भविष्यवाणी - दुसरे प्रबळ प्रमाण कुरआन हा ईशग्रंथ आहे आणि यात मोठ्या विषम परिस्थितीत काही अद्भुत भविष्यवाणी आहेत. ज्यांची पूर्ण होण्याची अजिबात संभावना त्या वेळी नव्हती. मानव बुद्धिमत्ता त्यांना असंभव मानत होती. परंतु कालांतराने त्या पूर्ण होताना जगाने पाहिले. उदाहरणार्थ, मानवी इतिहासातील दोन मोठ्या घटना आपल्यासमोर मांडण्यात येत आहेत.

अ) त्या काळी दोन पवित्र राजनैतिक सत्ता 'कैसर' (रोमच्या सम्राटाची उपाधी) आणि 'किसरा' (इराणच्या सम्राटाची उपाधी) होती. किसराने कैसरला पूर्णपणे पराजित केले. कैसरची सत्ता एकेश्वरवादी धर्मावर आधारित होती आणि 'किसरा'ची सत्ता अनेकेश्वरवादी धर्मावर आधारित होती. स्वभाविकपणे अरब-बहुदेववादी असल्याने त्यांचे मनोबळ वाढत गेले आणि ते पैगंबर व त्यांचे अनुयायी यांच्यावर अधिक अत्याचार करू

लागले. निंदा व तिरस्कार करू लागले आणि कायमचा नायनाट करण्याची तयारी होऊ लागली. अशा परिस्थितीत अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) आणि अनुयायींचे सांत्वण करण्यासाठी रोमच्या विजयाची स्पष्ट शब्दांत भविष्यवाणी केली. दहा वर्षाच्या आत हे घडेल हे निश्चित झाले होते. ही गोष्ट लोकांना असंभव जाणवत होती म्हणून ते थट्टा करू लागले. मुस्लिम ईशवाणीवर ईमान राखून होते. माननीय अबू बकर (रजि.) यांनी मक्केच्या सरदारांशी शंभर उंटांची हार-जीतची शर्यंत ठरवून घेतली. नवव्या वर्षांतच ही भविष्यवाणी खरी ठरली. रोमने इराणला पराभूत केले.

''अलिफ़ लाऽऽम मी ऽऽम रोमन लोक जवळच्या भूमीवर पराभुत झाले आहेत आणि आपल्या या पराभवानंतर काही वर्षाच्या आत ते विजयी होतील. अल्लाहचाच अधिकार आहे अगोदरसुद्धा व नंतर देखील, आणि तो दिवस असा असेल जेव्हा अल्लाहने प्रदान केलेल्या विजयावर मुस्लिम आनंद व्यक्त करतील. अल्लाह मदत करतो ज्याला इच्छितो आणि तो जबरदस्त व दयावान आहे. हे वचन अल्लाह ने दिले आहे. अल्लाह कधीही आपले वचन भंग करीत नसतो. परंतु बहुतेक लोक जाणीत नाहीत.'' *(दिव्य कुरआन - ३० : १-६)*

ही भविष्यवाणी हिजरी सन २ मध्ये पूर्ण झाली. जेव्हा रोमन लोकांनी इराणी लोकांवर विजय प्राप्त केला आणि त्याच वेळी 'बद्र'च्या रणभूमीवर मुस्लिमांनी अनेकेश्वरवादी शक्तींवर मोठा विजय मिळविला.

ब) मक्केच्या जीवनकाळात पैगंबर मुहम्मद (स.) आणि त्यांच्या अनुयायींना अनेकेश्वरवादीने फारच त्रास दिला. त्यांचे उठणे, बसणे, चालणे-फिरणे, खरेदी-विक्री, व्यापार इ. वर प्रतिबंध लादले. सामाजिक बहिष्कार केला. वस्तीपासून अलाहिदा एका खिंडीत घेरून त्यांना विवश केले. तहान-भूक भागविण्यासाठी त्यांना झाडाची पाने खावी लागली. सुके चामडे पाण्यात भिजवून खावे लागले. लहान-बालकांची दुधासाठीची आर्त हाक ऐकून मक्केचे काही उदार लोक रात्रीतून सरदारांपासून लपून शेळी-मेंढीचे दूध पोहचवून देत. किती भयंकर परिस्थिती असेल त्याची कल्पना न केलेली बरी! अशा परिस्थितीतसुद्धा खंबीरपणे आपले कर्तव्य पार पाडत राहण्यासाठी अल्लाहने पैगंबर मुहम्मद (स.) यांना आदेश दिले. त्याचबरोबर सांत्वना देत शुभसमाचारही दिला की, ''संकट लवकरच टळेल. आम्ही सगळीकडून त्यांची कोंडी करून त्यांचे जगणे मुश्किल करू, ते आपल्या घरांतच विवश होतील आणि तुमच्यापुढे शरणागती पत्करतील.''

"हे लोक पाहात नाहीत की आम्ही या भूमीवर चालून येत आहोत आणि हिचे वेटोळे सर्व बाजूंनी आवळत येत आहेत. अर्थात (दुष्टलोक त्यांच्या दुष्टतेमुळे लोकांच्या नजरेतून उतरू लागले आहे. आणि सत्याची प्रतिष्ठा लोकांच्या मनात घर करू लागली आहे. तरी सुद्धा दुष्ट लोक आपल्या ताकतीच्या भ्रमांत आहेत.) अल्लाह राज्य करीत आहे. कोणी त्याच्या निर्णयावर पुनर्दृष्टी करणारा नाही, आणि त्याला हिशेब घेण्यास काही विलंब लागत नाही. (अर्थात - दुष्कर्माचे परिणाम शीघ्र प्रकट होणार) यांच्या पूर्वी जे लोक होऊन गेले आहेत. त्यांनीदेखील मोठमोठाले डावपेच लढविले होते, परंतु खरा निर्णय तर पूर्णपणे अल्लाहच्या हातात आहे. तो जाणतो की कोण काय कमवीत आहे, आणि लवकरच हे सत्याचा इन्कार करणारे पाहतील की कोणाचा शेवट चांगला होतो.

हे इन्कार करणारे म्हणतात की तुम्हाला अल्लाहकडून पाठविलेले नाही. सांगा, "माझ्या व तुमच्या दरम्यान अल्लाहची ग्वाही पुरेशी आहे तसेच त्या व्यक्तीची साक्ष ज्याला ग्रंथाचे ज्ञान आहे." *(दिव्य कुरआन - १३ : ४३)*

"परंतु काय यांना दिसत नाही की आम्ही जमिनीला विविध दिशेने आकुंचित करीत राहिलो आहोत? मग काय हे वरचढ ठरतील? यांना सांगा "मी तर दिव्य बोधाच्या आधारावर तुम्हाला सावध करीत आहे." परंतु बहिरे हाक ऐकत नसतात जेव्हा त्यांना सावध केले जाते आणि तुझ्या पालनकर्त्याच्या प्रकोपाचा थोडा देखील स्पर्श यांना झाला म्हणजे लगेच आक्रोश करू लागतात की आमचे दुर्दैव! नि:संशय आम्ही अपराधी होतो." *(दिव्य कुरआन - २१ : ४४-४६)*

कुरआनचे असे स्पष्ट व खुले आश्वासन विरोधी लोकांच्या नजरेत निव्वळ एक कोरी कल्पनाच होती. परंतु आठ वर्षाच्या कालावधीतच असे परिवर्तन घडले की शक्तीचे संतुलन बिघडले. मक्केचे सर्व विरोधक आपल्या कुकृत्यावर पश्चात्ताप करू लागले. त्यांनी पूर्वीच सत्याला ओळखले होते, त्यांच्या शीरजोरीने त्यांना सत्य मान्य करू दिले नाही. नंतर त्यांनी ओळखले आणि स्वीकारलेसुद्धा.

३) ज्ञान-ज्योतीचा आविर्भाव (प्रकटीकरण) - तिसरे प्रमाण असे की कुरआनने ज्या विषयांची शिकवण दिली. त्याकाळी ज्ञानजगतात त्याबाबत कोणतीही चर्चा नव्हती. त्यात फक्त भौतिक ज्ञान-विज्ञानाच्या गोष्टी नव्हत्या की म्हणावे की प्रखर बुद्धी आणि उर्वराशक्तीच्या आधारे बुद्धीने त्याची कल्पना केली. त्या शिकवणींत जीवनातील विविध पैलूंवर आधारित गंभीर समस्यांचे समाधान आणि विखुरलेल्या साखळीचे सजीव चित्रण

सामील होते. ईशमार्गदर्शनाशिवाय कुणीही बुद्धिमान त्या गोष्टींचे खरे व पूर्ण ज्ञान प्राप्त करू शकत नाही. त्यामुळे ईशज्ञानालाच त्याचे एकमात्र साधन आणि स्त्रोत मानावे लागते.

"आणि तोच आहे ज्याने आकाशांना व पृथ्वीला सहा दिवसांत निर्माण केले जव्हा की हयापूर्वी त्याचे सिंहासन (अर्श) पाण्यावर होते. जेणेकरून तुम्हाला अजमावून पहावे, तुमच्यात कोण उत्तम काम करणारा आहे." *(दिव्य कुरआन - ११ : ७)*

"आणि अल्लाहने प्रत्येक जीवमात्र एक प्रकारच्या पाण्याने निर्माण केला."

(दिव्य कुरआन - २४ : ४५)

"आणि पाण्यापासून प्रत्येक सजीव निर्माण केला....!"

(दिव्य कुरआन - २१ : ३०)

सृष्टीच्या आरंभी सारे पदार्थ द्रवरूप व वायूरुप स्थितीत होते. मग हे असे की साऱ्या जीवधारींचे जीवन जल-आधारित आहे. ही गोष्ट आता आधुनिक विज्ञानाद्वारे समजली आहे. प्राचीन काळात ही बाब इतकी स्पष्ट नव्हती. त्याकाळी कुरआनने छातीठोकपणे या गोष्टींची सूचना दिली.

"काय ते लोक ज्यांनी (पैगंबरांचे म्हणणे ऐकण्यास) नकार दिला आहे, विचार करीत नाही की हे सर्व आकाश व पृथ्वी परस्पर एक संघ होते, नंतर आम्ही त्यांना विभक्त केले.....!" *(दिव्य कुरआन - २१ :३०)*

सृष्टी पूर्वीच्या स्थितीविषयी मोठे मतभेद आहेत. या बाबतीत वैज्ञानिकांच्या कित्येक परिकल्पना आहेत. परंतु त्यातल्यात्यात सर्वाधिक वैज्ञानिक मान्यताप्राप्त सिद्धान्त तोच आहे ज्याला (Big Bang Theory) म्हणतात. हे वरील आयतीप्रमाणे आहे.

"पवित्र आहे ते अस्तित्त्व ज्याने सर्व प्रकारच्या जोड्या निर्माण केल्या, मग त्या जमिनीतील वनस्पतींपैकी असोत अथवा खुद्द यांच्या स्वजातीय (अर्थात मनुष्य) पैकी अथवा त्या वस्तूंपैकी ज्यांची यांना माहिती देखील नाही." *(दिव्य कुरआन - ३६ : ३६)*

परिचित आणि अपरिचित सर्व वस्तूंत नर-नारी जोडपे अस्तित्त्वात आहेत, एवढेच नव्हे तर निर्जीव वस्तूंतही धनात्मक आणि ऋणात्मक प्रोटॉन आणि इलेक्ट्रॉन अस्तित्त्वात आहेत. त्याविना कोणतीही वस्तू अस्तित्त्वात येऊ शकत नाही. हा

आधुनिक व अघावत विज्ञानाचा शोध आहे आणि या वास्तविकतेला कुरआनने दीड हजार वर्षांपूर्वी स्पष्ट केले आहे.

"यांच्याकरिता आणखीन एक संकेत 'रात्र' आहे, आम्ही तिच्यावरून दिवस हटवितो तेव्हा यांच्यावर अंधकार पसरतो आणि सूर्य तो आपल्या ठराविक स्थानाकडे जात आहे. जबरदस्त सर्वज्ञ अस्तित्त्वाकडून (ईश्वराकडून) सुनिश्चित केलेला हा हिशेब आहे. आणि चंद्रासाठी आम्ही मजल ठरविल्या आहेत येथपावेतो की तो त्यातून वाटचाल करीत पुन्हा खजुरीच्या शुष्क फांदीसमान उरतो. सूर्याच्या आवाक्यात हे नाही की त्याने जावून चंद्राला गाठावे आणि रात्र ही दिवसावर मात करू शकत नाही. सर्व एका नभोमंडळांत तरंगत आहेत." *(दिव्य कुरआन - ३६ : ३७-४०)*

"आणि तो अल्लाहच आहे ज्याने रात्र आणि दिवस बनविले आणि सूर्य व चंद्र निर्माण केले. सर्व आप-आपल्या नभोमंडळात मार्गरत आहेत."

(दिव्य कुरआन - २१ : ३३)

ज्या वेळी कुरआनचे अवतरण झाले त्या वेळी व त्याच्या नंतर बऱ्याच काळापर्यंत खगोलशास्त्रज्ञ असे मानीत की पृथ्वी स्थिर आहे आणि सूर्य, चंद्र व तारे त्याच्या भोवती भ्रमण करीत आहेत. गॅलिलिओने हे सिद्ध केले की सूर्य स्थिर आहे व पृथ्वी गतीशील आहे. त्याचे हे संशोधन ख्रिश्चन पादरींच्या मान्यतेविरुद्ध होते, म्हणून त्याला शिक्षा दिली गेली. आता जगातील सर्व खगोलशास्त्रज्ञांचे एकमत आहे की आकाशातील सर्व ग्रह आणि आकाशगंगा निरंतर गतीशील आहेत.

कुरआनने दीड हजार वर्षांपूर्वीच सर्व ग्रह आपापल्या कक्षेत निरंतर फिरत आहेत आणि त्यांची गती संतुलित असल्याची घोषणा स्पष्ट शब्दांत करून दिली होती.

"आम्ही भूतलाचा विस्तार केला, तिच्यात पर्वत रोवले, तिच्यात प्रत्येक जातीची वनस्पती, यथायोग्य मोजमाप केलेल्या प्रमाणांनिशी उगविली आणि तिच्यात उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध केली, तुमच्यासाठीही व त्या पुष्कळशा निर्मितीसाठी देखील ज्यांना उपजीविका देणारे तुम्ही नाही. कोणतीही वस्तू अशी नाही जिचे खजिने आमच्याजवळ नाहीत. आणि ज्या वस्तूदेखील आम्ही उतरवितो एका ठराविक प्रमाणात उतरवितो." *(दिव्य कुरआन - १५ : १९-२१)*

जगातील प्रत्येक वस्तू संतुलित परिमाणात आहे, ज्यामुळे जगातील जीवनाचे साधन उपलब्ध आहे. ही गोष्ट वैज्ञानिकांना मान्य तर आहेच की ईशव्यवस्थेत असंतुलन निर्माण करून मानवाने जी आपत्ती ओढवून घेतली आहे त्याच्या समाधानासाठी ते संबंध जगात क्रियाशील झाले आहेत. "पर्यावरणाची" सुरक्षा आणि प्रदूषणमुक्त वातावरण तयार करण्यासाठी जगात कोट्यवधी डॉलर खर्च केले जात आहेत.

ईशमार्गदर्शनाकडे पाठ फिरवून धनसंपत्ती व सुखाच्या लालसेने जंगलतोड करून नैसर्गिक वनस्पती व झाडांचा सफाया, जनावरांच्या वंशाची समाप्ती, जमिनीतील खनिज संपत्ती व जल संपत्तीचा दुरुपयोग, ध्वनी आणि धुरामुळे वातावरण दूषित करणे, कारखान्यांतून निघणारे रासायनिक द्रव्ये, अणू परीक्षणापासून निघणारे दूषित पाणी व या सर्वांचा पृथ्वीवरील जल, स्थल आणि वातावरणाला विषारी करणे हे असे पाप, दुष्कृत्य आहे जे मागील दोनशे वर्षांपासून मानवाने आडपडदा न करता केलेले आहे. याच प्रकारे वैचारिक आणि नैतिक प्रदूषणाने नरक (दुष्टपणाचे निवासस्थान) बनविले आहे. या सर्व दुर्गुणांपासून मानवजातीला तेव्हाच वाचविता येईल जेव्हा मानवोपयोगी प्राकृतिक संतुलन जीवनात स्थापित केले जाईल. त्याच संतुलित मार्गाकडे कुरआन बोलावितो आहे,

"तोच ज्याने तुम्हाकरिता हिरव्यागार झाडापासून अग्नी उत्पन्न केला आणि तुम्ही त्यापासून आपल्या चुली प्रज्वलित करता." *(दिव्य कुरआन - ३६:८०)*

हिरव्यागार झाडापासून अग्नीची उत्पत्ती खरे तर ध्यानात येत नसेल. मग आता त्याचे अनेक अर्थ निघू लागले. साधारण अर्थ तर असा की दोन झाडांच्या घर्षणाने आग लागते. जंगलात जोरदार वादळ सुटल्यानंतर भयंकर आग लागते. वैज्ञानिकांच्या शोधकार्याने असे माहीत झाले की अतिप्राचीन काळात मोठमोठाले अरण्ये भूकंपामुळे अथवा इतर अन्य कारणांनी जमिनींत गाडले गेले. तेच आता कोळसा, तेल, गॅस इत्यादीत परावर्तीत झाले. तेच आज जगासाठी इंधनाचे भांडार होते. चुलीपासून ते मोठाले कारखाने आणि विभिन्न जनित्रे चालविण्यासाठीचे इंधन व आगीचे स्रोत तीच हिरवीगार झाडे आहेत.

"त्याने धरतीवर पर्वतांच्या मेखा गाडल्या जेणेकरून पृथ्वीने तुम्हाला घेऊन ढळू नये." *(दिव्य कुरआन - १६:१५, २१:३१, ३१:१०)*

धरतीच्या वातावरणात संतुलन स्थापन करणे आमच्या जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचे व जरूरीचे आहे. याकरिता पर्वतांची निर्मिती प्राचीन लोकांसाठी अद्‌भुत व कोड्यात टाकणारी जरी असेल पण आज धरतीचा परीघ, जाडी, वजन इत्यादींचा वैज्ञानिक अभ्यास केल्यावर नैसर्गिक स्थितीचे वैज्ञानिक समर्थन करतात.

"आणि तो कोण आहे ज्याने पृथ्वीला निवासस्थान बनविले आणि त्यांत नद्या प्रवाहित केल्या व त्यांत (पर्वतांच्या) खुंट्या रोवल्या आणि पाण्याच्या दोन साठ्यांच्या दरम्यान अडसर उभारले." *(दिव्य कुरआन - २७ : ६१)*

"दोन समुद्रांना त्याने सोडले की ते परस्परांत मिळावे तरीपण त्यांच्या दरम्यान एक पडदा आड आहे ज्याचे उल्लंघन ते करीत नाही."

(दिव्य कुरआन - ५५ : १९-२०)

पैगंबर मुहम्मद (स.) यांनी काही समुद्राची यात्रा केली नाही व कधी जलधारांचा वैज्ञानिक निरीक्षण केले नाही. त्याकाळचे विद्वान वैज्ञानिकांनासुद्धा या गोष्टीचे ज्ञान नव्हते की जलधारेत गोड व खाऱ्या प्रवाहांना वेगळे करणारा नैसर्गिक पडदा आहे. पाण्याची सांद्रता, घनत्त्व व बाहेरील ताण इत्यादी माहिती मिळाल्यानंतर त्याच्या कारणांचा पत्ता लागला आहे. परंतु या प्राकृतिक नियमाला कुरआनने फार पूर्वी स्पष्टपणे जगजाहीर केले.

"आणि जेव्हा (समुद्रात) या लोकांवर एक लाट छत्राप्रमाणे आच्छादित होते तेव्हा हे अल्लाहचा धावा करतात, आपल्या धर्माला अगदी त्याच्यासाठीच निर्भेळ करून." *(दिव्य कुरआन - ३१ : ३२)*

येथे एक गंभीर मनोवैज्ञानिक भावाचे रहस्य उघड केले आहे. आपत्तीकाळात जेव्हा सर्व पाठिंबे गळून पडतात अशा स्थितीत मनुष्य एकमात्र अल्लाहला मदतीसाठी हाक देतो. त्यावेळी दृश्य आणि अदृष्य सर्व पाठिंबे जे त्याच्यापासून लांब असतात त्यांना मदतीसाठी तो बोलावण्याचे साहस करीत नाही. हे एक असे सत्य आहे की ज्याची ग्वाही संकटातून बाहेर पडणाऱ्या नास्तिकाने दिली आहे. अशा घटना कित्येकांना ईमान स्वीकारण्यास आणि आपल्या वास्तविक ईश्वराजवळ आणण्यास सहाय्यक ठरली आहेत. त्या स्थितीचे यथार्थ विवरण अल्लाहच प्रस्तुत करू शकतो.

"आणि तो अल्लाहच आहे ज्याने तुमच्यासाठी तुमच्या सहचारिणी पत्नी

बनविल्या, आणि त्यानेच या पत्नीपासून पुत्रपौत्र प्रदान केले.''

(दिव्य कुरआन - १६ : ७२)

प्राचीन काळापासून आजपर्यंत विचारांत बराच बदल झाला आहे. परंतु आजही पुरुष आणि स्त्रियांमध्ये भेद असून स्त्रियांचे शोषण सुरूच आहे. जुन्या दर्शनिकांमध्ये तर स्त्रियांना पुरुष जातीपासून 'वेगळ्या प्रकारची जाती' म्हणून गणले आहे. यावरूनसुद्धा विवाद झाले की स्त्रीच्या शरीरात आत्मा आहे किंवा नाही. धर्मग्रंथात स्त्रीला पुरुषांचे विष आणि सर्प विंचू मानले. तिच्या अस्तित्त्वाला खोटे ठरविले गेले. तिच्यापासून अलिप्त राहण्याला व ब्रह्मचर्य पालनाला सदाचार म्हटले गेले. युरोप आणि भारतातील धर्मांत असेच काही चित्र दिसून येते. परंतु कुरआनने स्त्रियांना पुरुषांचे सजातीय ठरविले. मानव असल्याच्या दृष्टीने दोघांना समान दर्जा व अधिकार दिले गेले.

आजच्या काळात विज्ञान आणि इस्लामच्या प्रभावाने सिद्धान्तरूप सर्व लोक स्त्री-पुरुषाला समान श्रेणी देतात. परंतु व्यावहारिक दृष्टीने आजही भेदभाव कायम आहे. खाण्या-पिण्यात, पालनपोषण करण्यात भेदभाव पाळला जातो. विवाहात दहेज, हुंडा, स्त्रीजातीची भ्रूणहत्या इत्यादी गोष्टी आजही समाजात प्रचलित आहेत. यूरोपीय सभ्यतेने त्यांना प्रदर्शनाची, प्रचाराची वस्तू म्हणून वापर सुरू ठेवला आहे. तसेच पुरुषांच्या वासनापूर्तीसाठी तिचा वापर होत आहे.

''तो अल्लाहच आहे ज्याने तुम्हाला एका जिवापासून निर्माण केले व त्याच्याच जातीपासून जोडी बनविली म्हणजे तिच्या सानिध्यांत संतोष प्राप्त करावा.''

(दिव्य कुरआन - ७ : १८९)

''आणि त्याच्या संकेतचिन्हांपैकी ही आहे की त्याने तुमच्यासाठी तुमच्यामधून पत्नी बनविल्या, जेणेकरून तुम्ही त्यांच्यापाशी संतोष प्राप्त करावा. आणि तुमच्या दरम्यान प्रेम आणि करूणा उत्पन्न केली निश्चितच यात बरीच संकेतचिन्हे आहेत, त्या लोकांसाठी जे मनन व चिंतन करतात.'' *(दिव्य कुरआन - ३० : २१)*

पुरुष आणि स्त्री यांचे वास्तविक संबंध आणि त्याची गरज यावर कुरआनने विचार दिले ते विज्ञानालाही मान्य आहेत. परंतु या प्रेमभाव आणि मधुर संबंधाला इतके कडवट बनविले आहे की अविवाहित राहण्याला प्राधान्य दिले जाऊ लागले. यापुढे जाऊन समलैंगिक विवाह अर्थात पुरुष-पुरुष आणि स्त्री-स्त्रीचे अनैसर्गिक विवाहही सुरु

झाले आहेत. (काही राष्ट्रांनी याला मान्यता दिली.) आज लिंगपरिवर्तन करून स्त्रिया पुरुष बनू पाहात आहेत आणि स्त्री असून पुरुषांशी घृणा करीत आहे. यूरोपीय सभ्यतेला पसंत करणाऱ्या विद्वान लोकांनी याचा विचार केला पाहिजे की, असे का?

कुरआनच्या मार्गदर्शनापासून वेगळे मार्ग अवलंबून माणसाने जो काही मार्ग अवलंबिला त्याच्यासाठी तो आत्मघातकी ठरला आहे.

४) अकस्मात ज्ञानवर्षाव : पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या सुरुवातीच्या जीवनात लोक त्यांना निष्ठावंत, ईमानदार, विश्वासू व्यक्तीशिवाय काही जाणत नव्हते. त्यांनी कधी गूढ ज्ञानाची गोष्ट केली नाही आणि ईशप्रेरणेबाबत काही विधान केले नाही. या परिस्थितीत आयुष्याची चाळीस वर्षे व्यतीत झाली.

पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या जीवनकाळात उपलब्ध ज्ञानाची साधनेही नव्हती आणि अपूर्ण व निकृष्ट ज्ञानापर्यंत पोहोचण्याची साधने त्यांच्याजवळ नव्हती. त्यांना स्वत:ही अक्षरज्ञान नव्हते आणि कोणत्याही शिक्षण केंद्राला जात नव्हते. (ते 'उम्मी' होते) चाळीस वर्षाच्या अवस्थेत पैगंबर म्हणून नियुक्तीबरोबर एक विलक्षण तेज व ज्ञानाची प्रचिती झाली.

"अल्लाहने तुमच्यावर ग्रंथ व विवेक अवतरित केला आहे. आणि तुम्हाला ते सर्वकाही ज्ञात करून दिले आहे जे तुम्हाला माहीत नव्हते, आणि त्याची कृपा तुम्हांवर मोठी आहे." *(दिव्य कुरआन - ४ : ११३)*

"अशा प्रकारे (हे पैगंबर (स.)) आम्ही आपल्या आज्ञेने एक 'रूह' तुमच्याकडे 'वह्य' (दिव्य बोध) केली आहे. तुम्हाला काही माहीत नव्हते की ग्रंथ काय असतो व श्रद्धा काय आहे. परंतु त्या 'रूह' ला एक प्रकाश बनविले ज्याद्वारे आम्ही मार्ग दाखवितो आपल्या दासांपैकी ज्याला इच्छितो. निश्चितच तुम्ही सरळ मार्गाकडे मार्गदर्शन करीत आहात." *(दिव्य कुरआन - ४२ : ५२)*

वरील 'आयती'मध्ये कुरआनचे ज्ञान आणि शिकवण अल्लाहकडून येण्यापूर्वी पैगंबर या बाबतीत अनभिज्ञ व अपरिचित होते, याचा उल्लेख आहे. पहिल्यापासून ते ईशग्रंथ आणि इस्लामी शिकवणीशी परिचित नव्हते. काय कोणी व्यक्ती अल्लाहच्या मार्गदर्शनाशिवाय कुरआनसारखे दिव्य ग्रंथ आणि संतुलित जीवनव्यवस्थेबाबत मार्गदर्शन निर्माण करु शकतो?

एका निरक्षर (उम्मी) व्यक्तीसाठी इतक्या उच्चकोटींच्या ज्ञानांनी व उच्चकोटीच्या साहित्यिक रचनेने परिपूर्ण ग्रंथाची रचना करणे केवळ असंभव आहे.

पवित्र कुरआनला पैगंबरांची रचना स्वीकार करणे ही असंभव कल्पना आहे.

५) अलौकिक ज्ञान : पवित्र कुरआन फक्त संसार आणि जाणीव होणाऱ्या वस्तूबाबत ज्ञान देत नाही. परंतु या दुनियेपासून दूर जाणीव न होणाऱ्या अदृष्य बाबींचाही गोषवारा सादर करतो. त्यासाठी सत्याच्या पुष्टीसाठी या जगातील दिसणाऱ्या वस्तूंमधून असे प्रमाण एकत्र केले जातात की अदृष्य वस्तूसुद्धा नजरेसमोर जीवित रूप धारण करतात. ईशप्रेरणेशिवाय अदृष्य वस्तूंचे असे विस्तृत वर्णन शक्य नाही.

उदाहरणार्थ, येथे भूतकाळात शेकडो वर्षापासून गर्तेत पडलेल्या जुनाट घटनांचे सदृष्य वर्णन प्रस्तुत केले जाते, जे पैगंबर ईसा (अ.) यांच्या पवित्र माता मरयमच्या बालपणाचे आहे.

“(हे पैगंबर (स.)!) या परोक्षाच्या वार्ता आहेत ज्या आम्ही तुम्हाला दिव्य प्रकटनाद्वारे कळवीत आहोत. एरवी तुम्ही त्यावेळी, त्या ठिकाणी हजर नव्हता, जेव्हा हा निर्णय घेण्याकरिता की मरयमचा पालक कोण असावा, यासाठी आपापले फांसे फेकत होते. (चिठ्ठी टाकण्याचा प्रकार) आणि त्यावेळी देखील तुम्ही हजर नव्हता जेव्हा त्यांच्या दरम्यान भांडण होत होते.” *(दिव्य कुरआन - ३ : ४४)*

याचप्रकारे भविष्यातील घटनांबाबत सजीव वर्णन पाहावे,

“आणि त्या दिवशी सूर (नरसिंघ) फुंकले जाईल आणि ते सर्व मरून पडतील जे आकाशांत आणि पृथ्वीत आहेत, त्यांच्याखेरीज ज्यांना अल्लाह जिंवत राखू इच्छिल. मग आणखीन दुसरे नरसिंघ फुंकले जाईल आणि अकस्मात सर्वच्या सर्व उठून पाहू लागतील. पृथ्वी आपल्या पालनकर्त्याच्या तेजाने उजळून निघेल, कर्माची नोंदवही आणून ठेवली जाईल. सर्व नबी (पैगंबर) आणि सर्व साक्षीदार उपस्थित केले जातील. लोकांच्या दरम्यान ठीक ठीक सत्याधिष्ठित निर्णय दिला जाईल. त्यांच्यावर कोणताही अन्याय होणार नाही आणि प्रत्येकाला जी काही कर्मे त्याने केली होती, त्यांचा पुरेपूर बदला दिला जाईल.लोक जे काही करतात, अल्लाह ते चांगल्या प्रकारे जाणतो.

(या निर्णयानंतर) ते लोक ज्यांनी द्रोह केला होता. नरकाकडे टोळ्याटोळ्यांनी

हाकले जातील, इथपावेतो की जेव्हा ते तेथे पोहचतील तेव्हा तिची दारे उघडली जातील आणि तिचे कर्मचारी त्यांना म्हणतील, "तुमच्याजवळ तुमच्यापैकी असे पैगंबर आले नव्हते काय ज्यांनी तुम्हाला तुमच्या पालनकर्त्याची वचने ऐकविली आणि तुम्हाला या गोष्टीचे भय दाखविले की एका वेळी तुम्हाला असा दिवसदेखील पहावा लागेल?" ते उत्तर देतील, "होय, आले होते, परंतु प्रकोपाचा निर्णय अश्रद्धावंताना लागू झाला." सांगितले जाईल. दाखल व्हा नरकाच्या दरवाजात येथे आता तुम्हाला सदैव रहावयाचे आहे. अत्यंत वाईट स्थान आहे हे, गर्विष्ठांसाठी.

आणि जे लोक आपल्या पालनकर्त्याच्या अवज्ञेपासून अलिप्त राहत होते ते जथ्याजथ्याने स्वर्गाकडे नेले जातील. येथपावेतो की जेव्हा ते पोहचतील आणि त्याची दारे अगोदरच उघडली गेली असतील तेव्हा त्याचे व्यवस्थापक त्यांना म्हणतील की 'सलाम असो तुमच्यावर फारच चांगले राहिला तुम्ही, दाखल व्हा यात नेहमीसाठी' आणि ते म्हणतील, कृतज्ञ आहोत, त्या अल्लाहचे ज्याने आमच्याशी केलेले वचन सत्य करून दाखविले आणि आम्हाला पृथ्वीचे वारस बनविले. आता आम्ही स्वर्गामध्ये हवे तेथे आमची जागा बनवू शकतो. तर सत्य मोबदला आहे कर्म करणाऱ्यासाठी."

(दिव्य कुरआन - ३९ : ६८-७४)

या प्रकारच्या विवरणांनी कुरआन भरलेले आहे. भूतकाळ आणि भविष्य काळातील घटनांचे वर्णन कोणीही वर्तमानकाळात डोळ्यांनी बघितल्यासमान करूच शकत नाही. आणि ते ही आत्मविश्वासाने सर्व काळदर्शी ईश्वरच निश्चितपणे असे विवरण देऊ शकतो.

६) खंडन न होणारे स्थायी सत्य : ज्ञान आणि विज्ञानात इतकी प्रगती झाल्यानंतरही कुरआनमार्फत दिलेल्या कोणत्याही शिकवणीचे खंडन होऊ शकलेले नाही. आधुनिक विज्ञानाच्या विकासाने पवित्र कुरआनच्या असंभव वाटणाऱ्या मान्यतेची पुष्टीच झाली आहे. जी गोष्ट पूर्वी काल्पनिक समजली जात होती तिला आज विज्ञानाचे समर्थन प्राप्त झाले आहे.

अशा बऱ्याच मान्यताप्राप्त गोष्टी ज्यांचे कुरआन खंडन करीत आहे, शेवटी विज्ञानाने त्या खंडित झाल्या.

"लवकरच आम्ही यांना आमचे संकेत बाह्यजगात ही दाखवू आणि अंतरंगात सुद्धा येथपावेतो की यांच्यावर ही गोष्ट उघड होईल की हा कुरआन खरोखरीच

सत्याधिष्टित आहे. काय ही गोष्ट पुरेशी नाही की तुझा पालनकर्ता प्रत्येक गोष्टीचा साक्षी आहे.'' *(दिव्य कुरआन - ४१ : ५३)*

जीवशास्त्राची प्रगती आणि भौतिक, रसायनशास्त्र तथा खगोलशास्त्रीय अध्ययनाने मानवाच्या मनातील आणि विशाल विश्वात पसरलेल्या कितीतरी गोष्टींना स्पष्ट केले ज्याची कुरआनने पुष्टी केलेली आहे.

७) व्यावहारिकता : कोणत्याही सिद्धान्ताचे फक्त सिद्धान्त होणे उपयोगी नाही. जोपर्यंत तो व्यवहारात उपयोगी पडत नाही. कुरआनच्या शिकवणींची व्यावहारिकतासुद्धा त्याची सत्यता आणि ईशग्रंथ होण्याचे प्रमाण आहे. पवित्र कुरआनची शिकवण कल्पना व करमणुकीचे साधन नाही. ती सरळ व्यवहारात आणली जाऊ शकते. तसेच तिचे अनुकुल परिणाम जीवनावर पडू शकतात. सफलतेनंतरही शंका घेणे सर्वतः अनुचित आहे.

''सर्वजण मिळून अल्लाहच्या दोरीस घट्ट धरून असा आणि आपसांत फाटाफूट होऊ देऊ नका. अल्लाहच्या त्या उपकाराची आठवण ठेवा, जो त्याने तुमच्यावर केला आहे. तुम्ही एक दुसऱ्याचे शत्रू होता, त्याने तुमची मने जोडली आणि त्याच्या मेहेरबानी व कृपेने तुम्ही बंधूजन झालात. तुम्ही अग्नीने भरलेल्या एका खड्ड्यांच्या तोंडावर उभे होता, अल्लाहने तुम्हाला त्यापासून वाचविले. अशा प्रकारे अल्लाह आपली संकेतचिन्हे तुमच्यासमोर प्रकाशित करतो. कदाचित यामुळे तुम्हाला आपल्या कल्याणाचा सरळ मार्ग दिसावा.'' *(दिव्य कुरआन - ३ : १०३)*

इथे अरबच्या त्या अराजकतेचे वर्णन आहे ज्यात प्रत्येक वंशाचे लोक दुसऱ्या वंशाचे वैरी होते. त्यांचे जीवन आगीच्या कुंडाभोवती पडलेल्या लोकांसारखे कष्टमय होते. परंतु इस्लामच्या व्यवस्थेत ते सर्व भाऊ आणि मित्र झालेत. त्यांना अपूर्व अशी एकतेची प्रेरणा प्राप्त झाली. इस्लामच्या या प्रभावाची जाणीव जवळच्या सर्व लोकांच्या लक्षात आली. त्यांना या समाज नवनिर्माणाचे आवाहन केले जात होते की, ''या व्यवस्थेचे चांगले गुण पाहून त्याबरोबर सामील व्हावे. हाच तुमच्यासाठी कल्याणकारी मार्ग आहे. बाजूला उभे राहून तमाशा पाहू नका.''

स्वत:ची ओळख

१) ग्रंथाचे स्वत:चे विधान : पवित्र कुरआन स्वत:च्या बाबतीत असे विधान करतो की तो अल्लाहकडून पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर अवतरित झाला आहे. कुरआन ईशग्रंथ आहे हे विधान बाहेरून थोपलेले नाही तर कुरआन स्वत: हे विधान जगासमोर मांडत आहे. याकरिता तो स्वत: अखंडनीय प्रमाण प्रस्तुत करतो.

याचे महत्त्व अशा प्रकारचे आहे की एखादी व्यक्ती राजदरबाराचे संदेश घेऊन येते आणि स्वत:चा परिचय देते की तो कोण आहे. कशा करिता आला आहे? कुठून आला आहे? त्याचे आत्मपरिचय करून देणे यासाठी महत्त्वाचे आहे की, त्याशिवाय त्याला साधारण व्यक्ती समजून त्याच्या बोलण्यावर लोक विश्वास न करोत. साधारण माणसाला लोक आपल्या मर्जीने राजाज्ञा नसताना त्या पदावर बसवून दिल्यावर त्याचे विधान आत्मपरिचयाचे एक आवश्यक कार्य ठरते.

याचप्रमाणे कुणी साधारण व्यक्ती राजाज्ञेशिवाय राजदरबारापासून नियुक्तीचे विधान करेल तर त्याला त्याचे प्रमाण द्यावे लागेल. नाहीतर त्याच्या आदेशाचे पालन न करणाऱ्यांना (जनतेला) दोषी ठरवता येणार नाही. प्रमाणाशिवाय आत्मपरिचय अमान्य होईल, शंकेस पात्र राहील. यामुळेच पवित्र कुरआनने आपल्या परिचयाबरोबर प्रमाणही दिले आहे. असे नाही की काही लोकांनी आपल्या मनाने आस्था बनविली आणि कुरआनला ईशग्रंथाचे पद बहाल केले.

"आणि अशाच प्रकारे हा ग्रंथ आम्ही अवतरला आहे एक समृद्धशाली ग्रंथ म्हणुन तुम्ही याचे अनुसरण करा व अल्लाहच्या प्रकोपाला भिवून वागा, जेणेकरून तुमच्यावर दया केली जाईल." *(दिव्य कुरआन - ६ : १५५)*

"हा एक ग्रंथ आहे जो तुमच्याकडे अवतरला गेला आहे. म्हणुन हे पैगंबर (स.) तुमच्या मनात यासंबंधी कोणतीही शंका असू नये. हा अवतरण्याचा उद्देश असा आहे की तुम्ही याद्वारे (नकार देणाऱ्यांना) भय दाखवावे आणि ईमानधारकांना लोकांना उपदेश करावा." *(दिव्य कुरआन - ७ : २)*

"हे नबी (स.)! आम्ही हा ग्रंथ सत्यानिशी तुमच्याकडे उतरविला आहे की जो सरळमार्ग अल्लाहने तुम्हाला दाखविला आहे त्यानुसार लोकांमध्ये न्यायनिवाडा करा."

(दिव्य कुरआन - ४ : १०५)

"आणि हे पैगंबर (स.) आम्ही इच्छिले तर ते सर्वकाही तुमच्याकडून हिरावून घेऊ, जे आम्ही तुम्हाला दिव्य प्रकटनाद्वारे प्रदान केले आहे. मग आमच्या विरूद्ध तुम्हाला कोणी समर्थक मिळणार नाही जो ते परत मिळवून देऊ शकेल. हे तर जे काही तुम्हाला प्राप्त झाले आहे तुमच्या पालनकर्त्याच्या कृपेने मिळाले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की त्याची कृपा तुम्हावर फार मोठी आहे." *(दिव्य कुरआन - १७ : ८६-८७)*

२) उत्कृष्ट ज्ञान आणि भाषाशैली : पवित्र कुरआन आपल्या उत्कृष्ट व अनुपम भाषाशैली, अद्‌भुत साहित्यिक कला संयोजन आणि विविध विषयांच्या मार्मिक माहितीने परिपूर्ण आहे. साहजिक मानवाच्या कृतीपेक्षा उच्च स्तराची निर्मिती आहे. याच कारणास्तव पवित्र कुरआन अनेक ठिकाणी मानवाला आव्हान देत आहे, "जर तुम्ही याला ईशग्रंथ म्हणून स्वीकार करीत नाही तर याप्रमाणे एक ओळ व त्याचा प्रभागाशी समतुल्य रचना करून दाखवा." साहित्यिक उत्कृष्ठतेबरोबरच परम सत्याच्या ज्ञानाने परिपूर्ण "कुरआन"सारखा ग्रंथ काय तर एखादी आयत प्रस्तुत करणे मानवाच्या शक्तीबाहेर आहे. याकरिता त्या खोल ज्ञान आणि क्षमतेची गरज आहे जी केवळ अल्लाहजवळ आहे. सर्व मानवसमूह मिळूनसुद्धा अशी रचना प्रस्तुत करण्यात सदैव असमर्थ आहेत व राहतील. हे आव्हान केवळ त्या वेळच्या लोकांसाठी नव्हते तर हे नेहमीच राहील.

"काय हे म्हणतात की या माणसाने हा कुरआन स्वत:च रचला आहे? खरी गोष्ट अशी आहे की हे लोक श्रद्धा ठेऊ इच्छित नाहीत. जर हे आपल्या या कथनात खरे असतील तर यांनी अशाच वैभवाची वाणी रचून आणावी."

(दिव्य कुरआन - ५२ : ३३-३४)

"काय हे म्हणतात की पैगंबराने हा ग्रंथ स्वत: रचला आहे? सांगा "असे असेल तर या सारख्या रचलेल्या दहा सूरती तुम्ही रचून आणा आणि अल्लाह व्यतिरिक्त जे जे (तुमचे उपास्य) आहेत त्यांना सहाय्यासाठी बोलू शकत असाल तर बोलावून घ्या. जर तुम्ही (त्यांना उपास्य समजण्यात) खरे असाल."

(दिव्य कुरआन - ११ : १३)

"हे लोक असे म्हणतात काय की पैगंबरांनी स्वत: हा रचला आहे? सांगा, जर तुम्ही या आपल्या आरोपात खरे असाल तर एक अध्याय यासारखा रचून आणा आणि

एक अल्लाहला सोडून इतर ज्यांना ज्यांना बोलाविणे शक्य असेल त्यांना त्यांना मदतीला बोलवा.'' *(दिव्य कुरआन - १० : ३८)*

''जर तुम्हाला आमच्या दासांवरील या ग्रंथाचे अवतरण आमच्याकडून (साक्षात अल्लाहकडून) असण्याबद्दल शंका असेल तर यातील सूरह समान एकच अध्याय रचून दाखवा. आपल्या सर्व समर्थकांना बोलवा. एक अल्लाह शिवाय ज्या कुणाची हवी, त्याची मदत घ्या आणि जर तुम्ही खरे असाल तर हे कार्य करून दाखवा.''

(दिव्य कुरआन - २ : २३)

आधी पूर्ण कुरआनप्रमाणे तसेच पुस्तक आणण्यासाठी सांगितले, जेव्हा याचे उत्तर मिळाले नाही तर दहा अध्याय (सूरतें) बनविण्यास सांगितले. हेही संभव झाले नाही तर कुरआनसारखी एक सूरह (अध्याय) बनविण्यास सांगितले. एकट्याने नव्हे तर साऱ्या सहयोग्यांमार्फत हे काम एक आव्हान म्हणून सांगितले गेले. अरबी भाषेचे हजारो महाविद्वान आणि लाखो लिखित पुस्तके आहेत पण कुरआन आपल्या भाषाशैलींत सर्वोपरी आहे.

''सांगून टाका की मानव आणि जिन (अदृष्य निर्मिती) सर्वच्या सर्वजणांनी मिळून जरी या कुरआनसारखी एखादी वस्तू आणण्याचा प्रयत्न केला तरी आणू शकणार नाही, मग ते सर्व एक दुसऱ्याचे सहायक का असेनात.''

(दिव्य कुरआन - १७ : ८८)

कुरआनच्या अवतरणकाळात भाषाविशारद आणि उच्चकोटीच्या प्रसिद्ध साहित्यिकांनी या आव्हानासमोर घुडघे टेकले (शरणागती पत्करली). कुरआनला जादूचे मंत्र सांगून अपप्रचार केला व आपले तोंड लपविण्याचा प्रयत्न केला.

३) पैगंबरांची भाषा वेगळी : पवित्र कुरआनची भाषा आणि पैगंबर मुहम्मद (स.) ज्यांच्यावर कुरआन अवतरित झाला, यांची दैनंदिनची बोली भाषा वेगळी होती व त्यात फरक होता. पैगंबरांच्या समकालीन व्यक्तींनी हे तथ्य स्वीकार केले आहे. पैगंबरांचे हजारो आदेश व उपदेश त्यांच्या भाषाशैलीत आजपावेतो 'हदीस'च्या पुस्तकांत सुरक्षित आहेत. एकाच भाषेच्या या दोन शैलींची तुलना आजही केली जाऊ शकते आणि केली गेली आहे. पवित्र कुरआन तेवीस वर्षांच्या कालावधीत थोडा थोडा अवतरित होत राहिला. असे शक्यच नाही की एकच व्यक्ती इतक्या दीर्घकाळापर्यंत दोन प्रकारच्या

शैलींत बोलत राहील. शैलीविज्ञान कोणत्याही काळाच्या कोणी एक साहित्यकाराचे असे उदाहरण देऊ शकत नाही. कारण असे करणे मानवी क्षमतेच्या बाहेर आहे.

४) कुरआनची निश्चित विधाने आणि नियमांची समरसता : पवित्र कुरआन तेवीस वर्षांच्या मुदतीत अवतरित झाला. असे असताना निश्चित विधाने, परिकल्पना आणि विविध योजनांदरम्यान एकरूपता आणि तारतम्य असून कोणतेही मतभेद नाहीत. सर्व एकमेकांच्या संतुलित जीवनशैलीचे पुष्पगुच्छ तयार करतात. एवढ्या दीर्घकाळात परिस्थितीत चढ-उतार आले तरी पण निश्चित विधानांत, नियमांत आणि सिद्धान्तांत अनुकूलता कायम राहणे मानवाच्या आवाक्यात नाही. मनुष्य तर स्वतःच्या जीवनाबाबत सुरुवातीचे व शेवटचे काहीच जाणत नाही. माणसाच्या विचारात बदल घडत असतात, संघर्ष होत राहतात. सर्वज्ञ अल्लाहच वेगळ्या कालावधीत व वेगळ्या परिस्थितीत प्रभावित न होता अशी संतुलित योजना आखू शकतो. या कारणास्तव पवित्र कुरआन स्वतःच्या बाबतीत अंतस्थविरोध नसल्याचे प्रमाण प्रस्तुत करतो.

"काय हे लोक कुरआनवर विचार करीत नाही? जर हे अल्लाह शिवाय अन्य कोणाकडून असते तर यात पुष्कळशा विसंवाद आढळला असता."

(दिव्य कुरआन - ४ : ८२)

५) कुरआन काही नाविन्यपूर्ण आणि पहिला ईशग्रंथ नाही : पवित्र कुरआन काही पहिला अवतरित ग्रंथ नाही की त्याबाबत आश्चर्य व्यक्त करावे. यापूर्वी अनेक ईशग्रंथ इतर पैगंबरांवर मागील काळात अवतरित झालेले आहेत. मागील ग्रंथांत पवित्र कुरआन अवतरणाबाबत पूर्ण शुभसूचना दिली गेली होती. मागील पुस्तकांच्या ग्वाही नुसारच कुरआन अवतरित झाला आहे. कुरआन आपले खरेपण आणि ईशग्रंथ असल्याचे प्रमाणस्वरूप त्या मागील ग्रंथांच्या ग्वाहीला पुन्हा प्रस्तुत करीत आहे.

"हे पैगंबर (स.) त्याने तुमच्यावर हा ग्रंथ अवतरला जो सत्य घेऊन आला आहे व त्या ग्रंथांच्या सत्यतेची साथ देत आहे जे पूर्वी अवतरले होते. यापूर्वी त्याने मानवाच्या मार्गदर्शनाकरिता तौरात व इन्जील अवतीर्ण केले आहे."

(दिव्य कुरआन - ३ : ३)

"मग हे पैगंबर (स.)! आम्ही तुमच्याकडे हा ग्रंथ पाठविला जो सत्य घेऊन आला आहे आणि अल-क़िताब (पूर्व कालीन ईश्वरीय ग्रंथ)पैकी जे काही त्याच्यासमोर उपल्बध आहे, त्यातील सत्य प्रमाणित करणारा व त्याचा संरक्षक व त्याची निगा

राखणारा आहे.''   *(दिव्य कुरआन - ५ : ४८)*

''हे नबी (स.)! आम्ही तुमच्याकडे त्याच प्रकारे दिव्य प्रकटन (वही) पाठविले आहे. ज्याप्रकारे नूह (अ.) आणि नंतरच्या पैगंबरांकडे पाठविले होते. आम्ही इब्राहीम (अ.) इस्माईल (अ.) इसहाक (अ.) याकूब (अ.) आणि याकूबची सन्तान आणि ईसा (अ.) अय्यूब (अ.) युनूस, हारून आणि सुलेमान (अ.)कडे दिव्य प्रकटन पाठविले. आम्ही दाऊद (अ.) यांना 'जबूर' दिला.''   *(दिव्य कुरआन - ४ : १६३)*

मागील ईशग्रंथांपैकी मुख्यत्वे तीन ग्रंथ आजसुद्धा अस्तित्त्वात आहेत. ते आहेत 'तौरात' जो पैगंबर मूसा (अ.) वर अवतरित झाला. आणि दुसरा 'जबूर' जो पैगंबर दाऊद (अ.) वर अवतरित झाला, आणि तिसरा 'इंजील' जो पैगंबर ईसा (अ.) वर अवतरित झाला. हे तिन्ही ग्रंथ 'बायबल' नामक ग्रंथांत संग्रहित आहेत. ते पूर्णपणे सुरक्षित नसूनसुद्धा त्यात अनेक ठिकाणी कुरआनबाबत ग्वाहीचा स्पष्टपणे उल्लेख आहे. हाही एक सबळ पुरावा आहे की कुरआन ईशग्रंथ आहे.

याचप्रकारे पूर्वीच्या ईशग्रंथांचे कुरआन अनुमोदन करतो. कुरआनच्या या साक्षीने प्राचीन ईशग्रंथांची पुष्टी होते आणि त्यात आढळून येणाऱ्या शिकवणींचे मूल्य वाढते, ज्यांना कुरआनने ईशशिकवणीच्या रूपात प्रतिष्ठित केले आहे. पूर्वीच्या ग्रंथांवर कुरआनचे फार मोठे उपकार आहेत. त्या सर्व ग्रंथांत परिवर्तनामुळे असे भाग त्यात जोडले गेले ज्यांच्यामुळे त्यांची वास्तविकता दूषित आणि संदिग्ध झाली आहे.

आता तिसरे गौण प्रमाण अर्थात ऐतिहासिक निरंतरतेवर विचार करू या. इतिहासप्रसिद्ध सगळ्या धर्मांत ईशग्रंथांचे अस्तित्त्व आणि ईशप्रेरणांपासून प्राप्त शिकवणींची कल्पना कोणत्या न कोणत्या स्वरूपात आढळून येते. ही गोष्ट वेगळी की, दीर्घकाळाच्या अंतराने त्या ग्रंथांत फेरबदल झाले आणि स्वच्छ रूप राहिले नाही. या धारणेचे कायम असणे हे एक विचारणीय तथ्य आहे. ईशग्रंथ असतात आणि झाले आहेत म्हणून तर कल्पनेचा विस्तार खरा आहे. काही ग्रंथांचे दृष्टीआड होणे अथवा दूषित होणे म्हणजे ईशग्रंथांच्या अस्तित्त्वाला नाकारणे नव्हे.

ही कल्पना की अल्लाहने मानवाच्या कल्याणासाठी व मार्गदर्शनासाठी ग्रंथ आणि पुस्तक अवतरित केले बुद्धीला पटणारी गोष्ट आहे. तर्काद्वारेही याची पुष्टी होते. अल्लाहने संबंध सृष्टीची रचनाच या प्रकारे केली आहे की त्याच्या अस्तित्त्वासाठी व

विकासासाठी लागणाऱ्या साधनांची पूर्तता केलेली आहे. हवा, पाणी, प्रकाश, उष्णता इ.पासून खाणे-पिणे, कपडेलत्ते, फिरणे-चालणे आणि घर बांधण्यासाठीची सर्व साधने त्याच पालनकर्ता आणि सृष्टीकर्ता अल्लाहने उपलब्ध करून दिलेले आहेत. मानव चेतनाप्रधान जीव आहे. विचार आणि चिंतनाचे मार्ग प्रस्तुत करण्याचे साधनसुद्धा त्याच्यासाठी अनिवार्य आहे. बुद्धीची गरज आहे की अल्लाहने ज्याप्रकारे आमची प्राथमिक गरजांची पूर्ती केली आहे, त्याचप्रकारे द्वितीय गरजांची पूर्ती केली जावी, म्हणून बुद्धीच्या या मागणीचे उत्तर आहे ईशमार्गदर्शन आणि "ईशग्रंथ".

मानव भौतिक शरीराबरोबर अभौतिक आत्माही राखतो. भौतिक शरीराच्या गरजा भौतिक साधनांनी पूर्ण होतात. त्या साधनांशिवाय शरीराचा सांभाळ आणि विकास शक्य नाही. त्याचप्रकारे अभौतिक आत्म्याकरिता अभौतिक साधन व तत्त्वांची गरज आहे आणि ईशवाणी ऐकणे व समजणेच याची पूर्तता करतात. याच्याशिवाय मानव निर्बल आणि रोगी होईल जसे भोजनाशिवाय शरीराची परिस्थिती होते.

पवित्र कुरआन हा ईशग्रंथ असल्याचे तर्कशुद्ध प्रमाण आहेत. त्यातील एक असे की कुरआन शिकवणीचा अभूतपूर्व प्रभाव मानवी जीवनावर झालेला दिसतो. पवित्र कुरआनची शिकवण व प्रदर्शित मार्गावर चालणे व न चालणे याचा परिणाम जर एकसारखा असता तर तर्कानुसार स्वीकार करणे अथवा न करण्याला काही अर्थ राहिला नसता. इतिहास साक्षी आहे की पैगंबरांच्या जीवनकाळात अरबचे अशिक्षित, ग्रामीण, असभ्य लोकांनी इस्लाम स्वीकार केल्यानंतर पाहता पाहता इतिहासाच्या प्रवाहाला बदलून टाकले. त्यांच्या व्यक्तिगत जीवनात व समाजात असा काय सुधार आला की इतर राष्ट्रे व जाती त्यापासून प्रभावित झाल्या. ज्यांनी इस्लामला जीवनव्यवस्था म्हणून स्वीकारले त्यांची परिस्थिती तर बदललीच बदलली, त्यांच्या व्यतिरिक्त ज्यांनी आपल्या जुन्या विचारांवर कायम राहून सामाजिक सुधाराच्या रूपात इस्लामी व्यवस्था स्वीकारली त्यांचाही कायापलट झाला. सर्व प्रकारच्या विचारधारा, सामाजिक व धार्मिक व्यवस्थांमध्ये सुधार-आंदोलन सुरू झाले. मानवाधिकार, न्याय, नियम विधानाचे राज्य प्रस्थापित करण्याची चर्चा सर्वदूर सुरू झाली. हा सर्व पवित्र कुरआनचा पुरस्कार आहे.

काळ निघून गेल्यानंतर विविध कारणांनी अंतःकरणात इस्लामी शिकवणीचे मूळ कमकुवत झाल्याने अथवा विचलित मनाने झालेल्या सुधाराचा परिणाम कमी होत

गेला. परिस्थिती बदलण्याचे प्रयत्नही झाले. जेव्हा जेव्हा कुरआनवर आधारित सुधारणांचे प्रयत्न झाले, धर्माचा वसंत ऋतु परत आला. जगातील कोणताही ग्रंथ तत्त्वज्ञान, वाद असा मानव जीवनावर सशक्त व स्थायी प्रभाव टाकू शकला नाही.

शेकडो वर्षानंतर ज्ञान-विज्ञानच्या विकासाने सारे वाद आणि सिद्धान्तात परिवर्तन आले. परंतु कुरआनद्वारा स्थापित मान्यता आणि व्यवस्था यात कोणतीही बाब बिनकामाची आणि चुकीची सिद्ध होऊ शकली नाही. याउलट त्याची योग्यता व उपयुक्तता अधिक जाणवू लागली. काय मानव जो न्यायप्रिय आहे व ग्रंथांचे अध्ययन करणारा आहे त्याच्यासाठी अजून काही शंकेला आधार आहे?

कुरआन सुरक्षित आहे काय?

शंका : कुरआन शेकडो वर्षे जुना ग्रंथ असल्याने आपल्या मूळ स्वरूपात सुरक्षित नाही, कारण प्राचीन धार्मिक ग्रंथांच्या सुरक्षेसाठी काही साधन नव्हते.

कुरआन हा ईशग्रंथ सिद्ध झाल्यानंतर सर्वांत प्रथम प्रश्न असा की, दीड हजार वर्षे झाल्यानंतर कुरआन आपल्या मूळ स्वरूपात सुरक्षित आहे काय? जरी कुरआन ईशग्रंथ असला तरी इतक्या मोठ्या काळात त्यात फेरबदल आणि परिवर्तन होण्याची संभावना आहे. असे असेल तर त्याचा लाभ समाप्त होईल आणि तो ईशग्रंथ संबोधण्याच्या अधिकारापासून मुक्त होईल.

हा एक स्वभाविक प्रश्न आहे. आजपासून दोन-तीनशे वर्षांपूर्वी पुस्तकांना सुरक्षित ठेवण्याची योग्य साधने नव्हती. मुद्रणालय तर नव्हतेच, लेखनसामुग्रीही उपलब्ध नव्हती. प्राचीन काळी पुस्तकांच्या अनेक प्रति तयार करण्याकरिता लिपिक आपल्या हस्ताक्षरांत लिहीत असे. त्यांत चुका होत असत. वेळोवेळी त्यांत नवीन अंश, भाग जोडले जात आणि काही भाग वगळले जात. किडे, वाळवी आणि अग्नी व पाणी इत्यादीपासून संपूर्ण पाने अथवा पुस्तकाचा काही भाग नष्ट होत असे. त्या क्षतीग्रस्त अथवा हरवलेले भागांना त्या विषयाचे विद्वान पंडित आपल्या स्मरण शक्तीच्या आधारे पुन्हा लिहून काढीत. या प्रकारे पुस्तकाचे बहुमूल्य रूप नष्ट होत असे. हेच कारण आहे की सगळ्या जुन्या पुस्तकांच्या प्रतीत पाठांतर व वेगळे अंश सापडतात.

प्रमाण नसतांना अधिक तर लोक मूर्खपणे श्रद्धा व आस्थेने वशीभूत होऊन अशुद्ध प्रतींना डोळे झाकून शुद्ध समजतात. जर ते ग्रंथ धार्मिक असतील तर श्रद्धा व भक्तीभावाने अधिक घट्ट धरून ठेवतात. परंतु वैज्ञनिक पद्धतीने तपास केल्यास वादाची पुष्टी तर होत नाही आणि वास्तविकता स्पष्ट होते. हे साशंक तथ्य आहे की, काय पवित्र कुरआनची स्थिती अशीच आहे अथवा याहून भिन्न आहे. शंकांच्या वलयातून निघून विश्वास संपादन करण्याच्या स्थितीत निष्पक्ष भावाने वास्तविकता शोधण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. यामुळे हे आवश्यक आहे की पवित्र कुरआनच्या सुरक्षा साधनांचे परीक्षण करून त्याचे सुरक्षित असल्याची पुष्टी वैज्ञानिक प्रमाणाच्या आधारे प्राप्त केली जावी, मात्र धार्मिक आस्थेवर विश्वास न ठेवता.

पवित्र कुरआन अल्लाहचा अंतिम ग्रंथ आहे. संपूर्ण मानवजातीच्या मार्गदर्शनासाठी त्याचे सुरक्षित राहणे अनिवार्य आहे व हा ईशयोजनेचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. अल्लाहने सुरक्षेची जबाबदारी घेतली आहे. याचा स्पष्ट उल्लेख कुरआनमध्ये केलेला आहे. (कुरआन १५ : ९) परंतु ईश्वराने अलौकिक, अप्राकृतिक साधनांचा वापर न करता याची सुरक्षा मानवांद्वारे करवून घेतली आहे जी मानवशक्तीच्या ताब्यात आहे. त्याची पारख केली जाऊ शकते. जर अलौकिक रूपात सुरक्षेची व्यवस्था केली गेली असती तर आमच्यासाठी ती तपासणे व विश्वासपात्र परिस्थितीत पोहोचणे शक्य झाले नसते.

कुरआनच्या सुरक्षेसाठी दोन साधनांचे सहाय्य घेतले गेले. ही दोन्ही साधने अवतरणकाळापासून काही बदल न करता व्यवहारात आणले जात आहेत. पहिले आहे, ''हिफ़ज़ करणे'' तोंडीपाठ करणे व दुसरे आहे लिपीबद्ध करून ग्रंथरूपात सुरक्षित करणे.

पवित्र कुरआन थोडे-थोडे करून अवतरित झाला आहे. हे अवतरण देवदूतामार्फत तोंडी ध्वनिउच्चारणासोबत होत असे. अवतरणानंतर तात्काळ पैगंबर मुहम्मद (स.) त्वरित पाठ करून घेत आणि त्याचा प्रचार व प्रसारही करीत. पैगंबर स्वत: लिखाण करीत नसत व याकरिता लेखनकार्य करणारे लिपीक या कामासाठी नियुक्त केले होते व ते तात्काळ अवतरित कुरआनचे अंश लिहून घेत असत. कुरआनच्या ''आयती''चे अवतरण झाल्यावर लिपीक बोलविले जात आणि त्या आयतींना लिहून घेतले जाई. लिखित भाग पैगंबर (स.) पठण करवून घेत, कारण योग्य असल्याचे समाधान व विश्वास प्राप्त होई. त्या ''आयती'' अनेक लोक कंठस्थ करून एकमेकांना ऐकवीत. अन्य अनुयायी लोकांना ऐकवीत व संदेशाचा प्रचार-प्रसार करीत. लेखन सामुग्रीच्या रूपात झाडांची मोठाली पाने, उंटाची रूंद हाडे आणि कातडीच्या बारीक सालीचा वापर होत असे. मग त्याची अनेक प्रतिलिपी तयार करून दुसऱ्या मुस्लिमांपर्यंत पोहोचविली जाई व ठेवली जाई. त्यामुळे इतरांना वाचण्याची संधी मिळेल.

कुरआन पठणाला पुण्यकार्यांत सामील केले. त्याचबरोबर दररोज नमाज (प्रार्थना) मध्ये कुरआनच्या काही अंशाचे वाचन (तोंडी) अनिवार्य केले गेले. वर्षांतून एक महिना 'रमजान'मध्ये समाजाच्या सर्व लोकांना सामूहिकरित्या नमाज पठणात संपूर्ण

कुरआनचे पठण व ऐकणे अनिर्वाय झाले, प्रचलित झाले. ही सर्व कामे पैगंबरांच्या जीवनकाळातच सुरू झाली होती व साऱ्या मुस्लिमांसाठी आदर्श बनली होती.

याप्रकारे कुरआनची शिकवण व उपदेश यांच्या शिकण्या शिकवण्याचे कार्यही जोरात सुरु झाले. पाहता पाहता घरोघरी शिक्षणप्रशिक्षण आणि ज्ञानाच्या ज्योतीची चळवळ सुरू झाली. निरक्षरता व अज्ञानाचा अंधकार दूर झाला. साधारणपणे सर्वच मुस्लिम कुरआन शिक्षणात भाग घेऊ लागले. परंतु जे लक्ष देणारे दक्ष होते ते समाजात विशिष्ट स्थान प्राप्त करत होते. लोकांचा समूह त्यांच्याकडून शिक्षण घेण्याकरिता एकत्र होत असत. हे असे घडत गेले आणि अरब राष्ट्रावर इस्लामचा प्रभाव पडत गेला आणि सत्तास्थानावर मुस्लिम काबीज झाले आणि कुरआनचा आधार घेत सत्ता प्रस्थापित झाली. कुरआनज्ञानात जो श्रेष्ठ ठरला त्याला शासनात उच्च पद बहाल केले गेले. अशा प्रकारे व्यावहारिक जीवनात कुरआन उन्नतीचे साधन बनले. धार्मिक आस्था आणि पुण्य अर्जित करण्याबरोबर भौतिक उन्नतीसाठीचे कारण म्हणून कुरआन-प्रशिक्षणाकडे लोक आकृष्ट होऊ लागले आणि हे स्वभाविक होते. त्या काळी कुरआनव्यतिरिक्त इतर कोणत्याही ग्रंथांची चलती नव्हती कारण विविध प्रकारच्या ज्ञानापासून हे लोक दूर होते. सरकारी व्यवस्थेनुसार कुरआनचे अध्ययन घेण्यावर विशेष भर होता.

वरील कारणांनी लाखों लोक पिढ्या न् पिढ्या कुरआनचे शब्द, आयती, त्यांचे उच्चारण व अर्थज्ञान शिकत गेले. लाखों इसम असे आहेत ज्यांना संपूर्ण ग्रंथ कुरआन क्रमशः कंठस्थ आहे, पाठ आहे. याव्यतिरिक्त लिखित स्वरूपात याचा विस्तार इतका झाला की कोणतेही घर कुरआनच्या प्रतीशिवाय नव्हते. (त्या काळी मुद्रणालय नसतानासुद्धा) कारण ही दैनंदिन गरज होती. ते लिखित प्रती समोर ठेवून पाठ करीत असत. आता मुद्रणव्यवस्था अस्तित्त्वात आल्यानंतर अधिक प्रमाणात कुरआनचे मुद्रण होत आहे.

कुरआनच्या अवतरणकाळापासून ते आजतागायत एक दिवस असा गेला नाही की कुरआन लिखित रूपात नाही अथवा कोणी हाफीज नाही. त्याच्या पाठांतरात आणि मुद्रणांत जेवढी काळजी घेतली जाते, तेवढी अन्य पुस्तकांबाबत घेतली जात नाही. इतिहासातील उल्लिखित प्रमाणाप्रमाणे कुरआनच्या संरक्षणाची सगळी काळजी घेत प्रत्येक प्रत प्रमाणित केली जाते. हेच कारण आहे की जगाच्या कोणत्याही भागात उपलब्ध

कुरआनच्या प्रतीमध्ये कमी-जास्त आयती नाहीत, कोणतीही आयत मागे-पुढे नाही, क्रमवारीत त्रुटी नाही आणि पाठांतरात फरक नाही, लाखो प्रतीत अशी आश्चर्यजन्य साम्यता आणि शुद्धता कुरआनव्यतिरिक्त कोणत्याही प्राचीन पुस्तकांत आढळत नाही.

आपण कुरआनची एक प्रत अरब देशातील घ्या, एक प्रत इरानची घ्या, एक प्रत भारताची घ्या, एक प्रत इंडोनेशियाची घ्या, एक प्रत चीनची घ्या, एक प्रत समरकंदची घ्या, बुखाराची घ्या, एक प्रत तुर्कीची घ्या, एक प्रत स्पेन आणि यूनानची घ्या, एक प्रत इजिप्तची घ्या, एक प्रत अमेरिकाच्या कोणत्याही प्रांताची घ्या. सगळ्यांना एकत्र करा. त्यात तुलना करून पाहा. कोठेही एका अक्षराचा फरक अथवा क्रमांक फरक मिळणार नाही. एवढेच नव्हे तर वेगवेगळ्या शतकांतील प्राचीन, मध्यकालीन व आधुनिक युगातील नमुने पाहावे, तेच साम्य येथेही नजरेस पडेल. हे आव्हान काल्पनिक नाही. मानवाच्या प्रयत्नाने व्यावहारिक रूपाने या बाबतीत तपास व शोध लावून सिद्ध केले आहे.

युरोपात प्राचीन वस्तूंच्या शोधकार्याची एक लाट काही वर्षांपूर्वी आली होती. तेथील विद्वानांनी जगातील सर्व प्राचीन ग्रंथांची तपासणी व शोधकार्याचे काम केले. याच कामात विद्वानांच्या एका टोळीने बर्लिन (जर्मनी) शहरी कुरआनवर एक शोधकार्य केले. अतिमोठ्या भंडारातून जगातील कुरआनच्या प्रतीचे शतकानुसार, देशानुसार नमुने एकत्र केले. विद्वानांनी त्या प्रचंड संख्येच्या प्रतींची सूक्ष्म तपासणी व अध्ययन केले आणि सूरह (पाठ) ची तुलना केली. तब्बल चाळीस वर्षे अध्ययन व अभ्यास केल्यानंतर शोधकार्य करणाऱ्या समूहाने आपला अहवाल स्पष्टपणे मांडला व सादर केला की, कुरआनच्या कोणत्याही प्रतीत फरक नाही आणि कोठेही वेगळे अंश सापडले नाहीत. पूर्णरूपाने साऱ्या प्रतीत क्रमाच्या दृष्टीने समानता आढळली आहे.

त्या शोधकार्य करणाऱ्या समूहांत एकही मुस्लिम नव्हता. सदर काम मन लावून केले गेले, कारण इतर धार्मिक ग्रंथांत त्रुटी आणि कमतरता आढळून येतात, अशा काही त्रुटी व कमतरता कुरआनमध्ये शोधून जगाला दाखवायचे होते. उद्देश काहीही असो, परिणामाने हे सिद्ध केले की कुरआन सुरक्षित असल्याचे आव्हान मात्र कल्पना वा धार्मिक आस्था नसून एक कठोर सत्य आहे.

(टिपणी : विस्तृत माहितीसाठी वाचावे " खुतबात बहावलपूर"

लेखक - डॉ. हमीदुल्लाह (पॅरिस))

काही लोकांनी द्वेषभावनेने, कपटीपणाने कुरआनला असुरक्षित सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. याकरिता त्यांनी ज्या तर्कांचा सहारा घेतला आहे, येथे त्यांचा समाचार घेणे अप्रासंगिक होणार नाही.

हदीसच्या पुस्तकांत काही कथनं अशीही आहेत ज्यामुळे असे प्रतीत होते, की कुरआनमध्ये काही फेरबदल झाला आहे. हे यामुळे घडले की लोक हदीसच्या गुंतागुंतीच्या समस्येला समजू शकले नाही. हदीसमध्ये कोणत्याही घटनेचा उल्लेख मात्र त्या घटनेची सत्यता सिद्ध करीत नाही. कथन करणाऱ्या उल्लेखकर्त्यांचे जीवन आणि आचरणाबाबत तपास करावा लागतो. अर्थात असत्य आचरणकर्ता कुणी दुर्भावनेने काही गोष्टी घडवून कथन करत असेल तर त्याचे कथन स्वीकार केले जात नाही. हदीस कथनकर्ताच्या चरित्राच्या कसोटीसाठी हदीसच्या मान्यवर ग्रंथात नियम निर्धारित केले आहेत. हदीसमध्ये भ्रम निर्माण होण्याची कारणे मुख्यत: दोन प्रकारची आहेत.

(१) पहिले कारण आहे खोटी हदीस घडण्याचे षडयंत्र. कुरआनच्या आरंभिक काळात जे पहिल्या इस्लामविरोधी गटांत सामील होते, धीटपणाने इस्लामचा विरोध करत राहिले. इस्लामच्या सफलते व प्रसारानंतर आता तसे करणे त्यांना कठीण जाऊ लागले. त्यामुळे त्यांनी विरोधासाठी दुसरी रणनीती अवलंबिली. इस्लामच्या शिकवणीत गडबड करण्याच्या दुष्ट भावनेने इस्लामचा खोटा स्वीकार करून मुस्लिम समाजात घुसले की शिकलेल्या लोकांत व नव-मुस्लिम लोकांदरम्यान कुरआन आणि पैगंबरांबाबत अतिहुशारीने व सावधगिरीने भ्रम, कपट पसरू लागले. हे सर्व थांबावे म्हणून प्रयत्नही झाले. परंतु ते दुय्यम स्थानी क्रियाशील होते. त्यांच्या कथनालाही हदीसच्या पुस्तकांत लिहून घेतले गेले. परंतु त्या कथनाबाबत विचारपूस केली गेली व शेवटी त्यांची ती कथने असत्य सिद्ध केली गेली. परंतु काही पुस्तकांच्या लेखकांनी चौकशी न करता त्यांच्या कथनाला आपल्या पुस्तकांत जागा दिली. यामुळे काही पुस्तकांत अशी कथने मिळून येतात.

(२) दुसरे कारण असे की काही कथनांबाबत तात्पर्य आणि खरा अर्थ न समजता दुसरा अवांच्छित अर्थ समजला गेला. उदाहरणार्थ, काही कथनांत असा उल्लेख मिळतो की अमुक व्यक्ती जवळच्या कुरआनच्या प्रतीत अमुक कथनानंतर हे वाक्य विशेष रूपाने लिहिलेले होते, आता दुसऱ्या प्रतीत ते आढळून येत नाही.

नंतरच्या काही लोकांना असा भ्रम झाला की कुरआनचे काही अंश काढून टाकण्यात आलेले आहेत. परंतु विस्तृत माहिती मिळाल्यानंतर असे माहीत पडले की काही शब्दांचे अर्थ अथवा त्यासंबंधी एखाद्या घटनेचा उल्लेख तिथे याकरिता केला होता की त्या प्रतीच्या वाचकांना ते माहीत व्हावे. अर्थात ते अतिरिक्त अंश अथवा वाक्य 'कुरआन'च्या व्याखेच्या रूपात होते, ते कुरआनचे अंश नव्हते.

आरंभिक काळातील विद्वान काही 'आयती'ना 'मंसूख' म्हणतात. यामुळे त्यांचे तात्पर्य असे की त्या आयतीत वर्णित गोष्ट ज्या परिस्थितीनुसार अवतरित झाली होती आता ती परिस्थिती राहिली नाही व तो आदेश या ठिकाणी लागू पडत नाही. भविष्यात जेव्हा तशी परिस्थिती उद्‌भवेल तेव्हा तो आदेश लागू पडेल. परंतु मोहजाल म्हणून नंतर काही असे समजू लागले की कुरआनच्या काही आयती निरस्त झाल्या आणि त्यांना कुरआनमधून बाहेर काढण्यात आले. याच प्रकारच्या काही अन्य गोष्टीसुद्धा समजण्यात झालेल्या चुकीमुळे काही अज्ञानी अनर्थ करीत आहेत.

कुरआनला पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या हयातीत पूर्णपणे लिखित स्वरूपात सुरक्षित ठेवण्यात आले होते. नंतर त्याच्या जेवढ्या प्रती देश-विदेशांत होत्या त्यांच्या विश्वसनीयातेसाठी राजकीय समित्यांकडून लेखनकार्य झाले. लाखो लोकांनी त्या प्रती पाहिल्या. परंतु एका व्यक्तीने संदेह दर्शविला नाही की कुरआनमध्ये परिवर्तन केले गेले आहे. मग त्याच विश्वसनियतेप्रमाणे निरंतर व्यवहारांत कुरआन वापरला गेला. कुरआन त्या काळात छापलेल्या स्वरूपात नव्हता. लाखो लोकांच्या प्रतिदिन पठण-पाठणबरोबर तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचला. याच्या विरोधांत एखाद्या व्यक्तीच्या कथनाला ज्यात निरंतरता नाही, कसा विश्वास ठेवता येईल? त्यांच्या कथनात जरादेखील खरेपण असते तर इतिहासात त्या बाबतीत मुस्लिमांत मतभेद असल्याची नोंद झाली असती. प्रत्येक युगातील इतिहास सुरक्षित आहे. कोणत्याही काळात मुस्लिमांना कुरआनच्या मूळ ग्रंथासंबंधी मतभेदाचा उल्लेख नाही. काय कुरआनात परिवर्तनाला सहजासहजी मुस्लिम सहन करू शकले असते? कारण एकही आवाज या बाबतीत ऐकू आला नाही. जर मतभेद असते तर त्या कारणाने दोन प्रकारचे कुरआन अस्तित्त्वात असते.

कुरआनात क्रमिक विज्ञानाचा अभाव आहे काय?

शंका : कुरआनच्या आयतीतील विषय क्रमवार नाहीत, पुनरावृत्ती जास्त आहे आणि लेखन कुशलतेचा अभाव आहे. असा ग्रंथ ईशग्रंथ कसा असू शकतो?

कोणताही सार्थक, सफल व उपयोगी ग्रंथ आपल्या उद्देश, हेतु आणि विषयाच्या केंद्रीकरणाला धरून चालते. आपल्या हेतुनुसार अनुकूल भाषाशैली आणि विषयप्रवीणता अवलंबिली जाते. ती आपल्या ध्येय व अंतिम परिणामापर्यंत पोहोचण्यासाठी निश्चित मार्ग ठरवते. यात कोणत्याही बाबीची कमतरता त्या ग्रंथाच्या सफलतेत अडचण निर्माण करेल, या दृष्टिकोनातून कुरआनबाबत विचार केला तर त्याची साहित्यिक सुंदरता आणि लक्ष-सिद्धीची प्रवीणता आणि वाङ्मय कला-कौशल्ये स्पष्ट होतात.

एखाद्या ग्रंथाच्या वाचनासाठी त्याचा विषय आणि हेतू जाणून घेणे आणि कला-कौशल्याचे सूक्ष्म अवलोकन आवश्यक आहे. कुरआन काही साधारण ग्रंथ तर नाही. याची भाषाशैली मानव-रचित ग्रंथांपेक्षा भिन्न आहे. यास समजण्यासाठी थोडी मेहनत करावीच लागेल. एकाहून अधिक वेळा त्याचे योग्य रूप समजून घ्यावे लागेल.

जर साहित्याच्या विद्यार्थ्याला सांख्यिकी विषयाचे पुस्तक दिले अथवा इतिहासाच्या विद्यार्थ्याला अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय पुस्तक दिले तर त्याच्यासाठी विचित्र परिस्थिती निर्माण होईल, याचा सहज अंदाज लावला जाऊ शकतो. हे असे याकरिता होते की तो त्या विषयाच्या आधारभूत सिद्धान्त आणि विषयापासून अनभिज्ञ आणि अपरिचित आहे. कुरआन मात्र मानवी जीवनाविषयीच चर्चा करतो, त्यामुळे अपरिचित असल्याची भावना नसते. तरीपण धर्माबाबत संकुचित कल्पना माणसाच्या हृदयात घर करून राहत असल्याने सुरूवातीला स्वाभाविकपणे समस्या उत्पन्न होतात. अशा समस्या काही ठिकाणीच उत्पन्न होतात, ज्यांचे समाधान करणे सहज शक्य होते.

कुरआन लिखितरूपात अवतरित झाला नाही. तो लहान लहान भागांत भाषण व आवाहनाच्या रूपाने अवतरित झाला आहे. देवदूताचा आवाज पैगंबरांनी ऐकून ते लिहून घ्यायला लावले. अवतरित अंश त्या वेळच्या घटनेवर, परिस्थितीवर आधारित असे. वर्तमान परिस्थितीच्या बऱ्याच गोष्टी गौण समजून विषय पुढे सरकत गेला.

लोकांसमोर त्या वेळी परिस्थितीची जाण होती व त्यांच्यासमोर कुरआनचे आवाहन होते, त्यामुळे त्यांना समजायला कठीण गेले नाही. दुसरी गोष्ट अशी की कुरआन थोडक्यात सिद्धान्त मांडत असे. तसे जर केले नसते तर ग्रंथ अत्यंत मोठा झाला असता आणि सुरक्षा आणि पाठांतरासाठी मोठा अडसर ठरला असता. अशा प्रकारे संक्षिप्त रूपात व्यापक गोष्टी मांडणे ही विशिष्ट कला त्या वेळी अरबांत एक विशेषता मानली जात.

कुरआनचा प्रत्येक अध्याय (सूरह) एका केंद्रीय विषयावर आधारित आहे. काही गोष्टींच्या बाबतीत विस्तृत माहितीनंतर परत केंद्रीय विषयावर येत असे. यामुळे क्रमभंग झाल्याची जाणीव होते. याचप्रकारे एखाद्या गोष्टीची पुनरावृत्ती ध्यान आकृष्ट करण्यासाठी केली आहे जे सिद्धान्ताचे अभिन्न अंग आहेत. या पुनरावृत्तींत शब्द आणि भाषाशैलीत परिवर्तन करून असे सौंदर्य उत्पन्न केले गेले आहे की ते दोष नसून गुणांचा अनुभव होतो. परंतु अनुवाद करताना ध्वनिसरलता व शब्दांची ठेवण पूर्णत: उतरवणे शक्य नाही. यामुळे अनुवादाच्या माध्यमातून कुरआनचे अध्ययन करणारे या पुनरावृत्तीच्या सौंदर्याचे दर्शन व लाभ घेऊ शकत नाहीत.

कुरआन या जगाला आणि परलोक जीवनाला परस्पर पूरक आणि आश्रित, पराधीन तथ्याच्या रूपात प्रस्तुत करतो. मानवाच्या डोक्यात उत्पन्न होणारी जिज्ञासा आणि भ्रमाच्या निवारणासाठी लहान लहान आयती अद्‌भुत चमत्कार दाखवितात. मनोविज्ञानाच्या गहन गोष्टीला न समजणारे वर वर उदासीन भावाने पुढे जातात. कुरआनचे एक एक वाक्य (आयत) चिंतन मनन करण्याचे आवाहन करते. सहज व सरासरी अध्ययन करण्यासाठी हा ग्रंथ नाही.

कुरआनची आपली स्वत:ची विशिष्ट लेखनकला आहे. त्यात क्षणाक्षणांत विषयात बदलाव येत असतो. कधी आकाशाबाबत गोष्ट होत असेल तर अकस्मात विषय न बदलता जमिनीबाबत गोष्ट सुरू होते. जगातील गोष्टींच्या दरम्यान अचानक पारलौकिक विषय सुरू होऊन जातो. याचप्रकारे संबोधनाचे पात्र अचानक बदलते. कधी अल्लाहचे संबोधन सुरू असतानाच मध्येच पैगंबर (स.) यांना संबोधित केले जाते. कधीकधी हे निश्चित करणे कठीण जाते की हे संबोधन कुणाकडून आणि कुणासाठी आहे. असे होणे ही एक प्रकारची विशिष्ट कला आणि प्रभावाचे प्रदर्शन होय.

त्याची ओळख पटल्यावर त्याच्या सौंदर्याचे अवलोकन होऊ शकते.

कुरआनची अशी एक विशिष्ट शैली आहे की एखाद्या घटनेच्या विवरणांत एक बाजू स्पष्ट होते आणि यावरून निश्चित होते की दुसरी बाजू काय असू शकते. परंतु कुरआन स्पष्ट शब्दांत ते उघड करीत नाही आणि ती गोष्ट वाचकांवर विश्वासाने सुपूर्द केली जाते की ते बुद्धीचा उपयोग करून समजून घेतील. त्या गुप्त अंशाचे विवरण न मिळाल्याने एका साधारण वाचकाला क्रमाची विकृती जाणवू लागते. म्हणून वाचकाने फक्त ग्रंथावर अवलंबून न राहता आपल्या बौद्धिक कौशल्याचा वापर करून अर्थ ग्रहण करणे, सतर्क राहणे आवश्यक आहे.

उदाहरणाकरिता विपरीत गुणाच्या पदार्थाचे विवरण याप्रकारे करणे की ज्या एकाच्या गुणाचे वर्णन केले जावे की त्या गुणाला दुसऱ्या पदार्थासाठी सोडून दिले जावे जेणेकरून वाचक त्या गुणाला स्वतः समजून घेईल, तसेच दुसऱ्या पदार्थाच्या त्या गुणाचे वर्णन केले जावे ज्याच्या विपरीत गुणाला पहिल्या पदार्थांत सोडून दिले जावे. याची बरीच उदाहरणे कुरआनात सापडतील. चांगले आणि वाईट गुणांचे लोक, स्वर्ग आणि नरक, दिवस आणि रात्र इत्यादींचे वर्णन... इ.

येथे आपण दिवस-रात्रचे एक वर्णन पाहू या -

"तो अल्लाहच आहे ज्याने तुमच्यासाठी रात्र बनविली की तिच्यांत संतोष प्राप्त करावा व दिवसाला प्रकाशमान बनविले." *(दिव्य कुरआन - १०:६७, २७:८६)*

येथे रात्रीला आराम करण्यासाठी लाभदायक दाखवले गेले आहे आणि 'अंधकारा'चे वर्णन केले नाही जो 'रात्री'चा एक गुण आहे. याकरिता की त्याच्या विपरीत 'दिवस' प्रकाशमान असल्याचे वर्णन दिले आहे. प्रकाशमानच्या विरुद्ध गुण 'अंधकारमय' हा अर्थ वाचक आपल्या कल्पनेने बुद्धीने समजून घेईल. रात्री 'आराम' करण्याचे वर्णन आहे तर त्याच्याविरुद्ध दिवसा परिश्रम करणे व उपजीविकेसाठी प्रयत्न करण्याचे वर्णन लपवून ठेवले आहे, येथे पाठकाने स्वतःची बुद्धी चालवून पूर्तता करावी. पूर्ण गोष्ट जर उघड केली तर ती या प्रकारे असेल.

"तोच आहे ज्याने तुमच्यासाठी रात्रीला (अंधकारमय) बनविले, म्हणून तुम्ही त्यात आराम करावा, सुख उपभोगावे आणि दिवसाला प्रकाशमान बनविले (कारण

प्रकाशात आपला काम-धंदा आणि परिश्रम करावे.)''

'आयती'मधील वर्णन पाठकाला विचित्र आणि अपूर्ण जाणवेल. परंतु काव्यगुणांनी परिचित माणूस त्यात जे कौतुक आहे, त्या सरळ सरळ व उघड वर्णनांत नाही हे सहज जाणून घेतो.

याचबरोबर या आयतीत एक चमत्कार लपलेला आहे जो अनुवादामुळे स्पष्ट होत नाही. ज्या शब्दाचा अनुवाद ''प्रकाशमान'' अथवा ''रोशन' केला गेला आहे, त्याचा मूळ शब्द अरबी भाषेत ''मुबसिरा'' आहे ज्याचा अर्थ असा ''पाहताना'' अथवा ''डोळे उघडे ठेवत''. याचा विपरित अर्थ ''अंधकार'' नसून ''डोळे मिटलेला'' असा होईल. तात्पर्य असे की त्याच्यापासून अंधकार आणि प्रकाश आहे. परंतु पाहणे, डोळे उघडे ठेवणे अथवा डोळे मिटणे हे प्राण्यांची सवय आहे. निर्जीव वस्तुत या हालचालीला मानवीकरण (म्हणजे निर्जीव वस्तू व्यक्ती आहेत असे समजणे) केले गेले. याप्रकारे रात्र आणि दिवस आमचे सहचर बनले आहेत. अशा वर्णनाने प्रभावात वृद्धी होत जाते.

या प्रकारची उदाहरणे कुरआनात भरपूर आहेत. जेव्हा वाचक कुरआन पाठ (तिलावत) करतो, तेव्हा साऱ्या घटना चलचित्रपटासारख्या त्याच्या मेंदूत गतिशील आणि जीवित रूपात उपस्थित होतात. वाचक त्याच्यासोबत या सहयात्रेला जाऊ लागतो.

कुरआनची लहान लहान वाक्ये मानवाच्या हृदयाला प्रभावित करतात. त्याचे हृदय चैतन्यमय असेल तर ही वाक्ये बाणाप्रमाणे सरळ प्रवेश करून कायापालट करतात. काही नमुने येथे देण्यात येत आहेत.

''हे मानवा! कोणत्या गोष्टीने तुला आपल्या पालनकर्त्याच्या बाबतीत संभ्रमात टाकले, ज्याने तुला निर्माण केले, तुला नखशिखांत व्यवस्थित केले, तुला प्रमाणबद्ध बनविले आणि ज्या रूपात इच्छिले तुला जोडून तयार केले.''

(दिव्य कुरआन - ८२ : ६-८)

''हे लोकहो ज्यांनी श्रद्धा ठेवली आहे, अल्लाहचे भय बाळगा आणि प्रत्येक इसमाने हे पहावे की त्याने उद्यासाठी काय संरजाम केला आहे. अल्लाहचे भय बाळगत रहा. अल्लाह खचितच त्या सर्व कृत्यांची खबर राखणारा आहे जी तुम्ही करता.''

(दिव्य कुरआन - ५९ : १८)

"काय श्रद्धावंतांसाठी अद्याप ती वेळ आली नाही की त्यांची हृदये अल्लाहच्या स्मरणाने द्रवली जातील आणि त्याने अवतरलेल्या सत्यापुढे नमतील?"

(दिव्य कुरआन - ५७ : १६)

"काय या लोकांनी कुरआनवर विचार केला नाही अथवा हृदयांवर त्यांच्या कुलुपे लागलेली आहेत?" *(दिव्य कुरआन - ४७ : २४)*

सारांश, कुरआनच्या काव्यगुण आणि भाषा-शैलीबाबत अज्ञान असल्याकारणाने एक साधारण वाचकासमोर समस्या उभ्या राहतात. कुरआनात काव्यसौंदर्य आणि साहित्यिक सौंदर्य इतके अधिक आहेत की अरबचे साहित्यिक व कवी यांनी कुरआन अवतरणानंतर आपले कविता करणे सोडून दिले. विचारल्यावर त्यांनी सांगितले की आता कुरआननंतर यापुढे अशी चांगली रचना निर्माण करूच शकत नाही.

कुरआनच्या फार थोड्या 'तफसीर' (भाष्य व टीका) लिहिल्या गेल्या ज्यांत साहित्यिक मर्म ठळकपणे मांडले गेले. अधिकांश कुरआनचे नियम-विधान, शिक्षा आणि व्यावहारिक उपयोगाचे विवरण हेच तफसीरचे मुख्य विषय असत. हेच कारण आहे की अधिकांश वाचक या दृष्टिकोनातून अध्ययन करीत नाही आणि मुस्लिम तर श्रद्धेपायी आणि ईश-कोपाच्या भयाने समजून घेण्याच्या मार्गातील अडीअडचणीला खुल्या दिलाने सांगत पण नाही. त्यामुळे अधिकांश लोक या ज्ञानापासून वंचित राहिले आहेत.

कुरआनात विरोधाभास आहे काय?

शंका : कुरआनच्या कथनात परस्पर अंतर-विरोध अथवा विरोधाभास आढळतो. परंतु कुरआन तर असे आवाहन करतो की त्यात विरोधा-भास नाही.

कुरआन एक संतुलित आणि सामंजस्यपूर्ण ग्रंथ आहे. यातील कथन आणि वक्तव्यात विसंगती नाही. हा एक असा असाधारण गुण आहे जो अन्यत्र मिळणार नाही. मुख्य रूपाने बहुविध ज्ञानव्यापक नियम-व्यवस्थेत ग्रंथात चुका अनिर्वाय असतात. कुरआन विभिन्न परिस्थितीत थोडा थोडा करून २३ वर्षांच्या कालावधीत अवतरित झाला आहे. अशा स्थितीत यात अगणित विरोधाभास आणि नियमांची भिन्नता असली पाहिजे. परंतु तसे नाही, कुरआनची एक कडी दुसऱ्या कडीसोबत याप्रकारे गुंतलेली आहे की नियम व कायदा याप्रकारे एक-दुसऱ्याबरोबर परस्पर समन्वय साधून आहेत. सामंजस्य रूप धारण केले आहे, जसे एखाद्या मशीन व यंत्राचे भाग एकमेकांत गुंतलेले असून कार्यरत आहेत. कुरआन आपल्या या गुणाचे वर्णन याप्रकारे करीत आहे,

"काय हे लोक कुरआनवर विचार करीत नाही? जर हे अल्लाहशिवाय अन्य कोणाकडून असते तर यांत पुष्कळसा विसंवाद आढळला असता."

(दिव्य कुरआन - ४ : ८२)

कुरआनद्वारा स्थापित मानदंड हा कायमस्वरूपी मानदंड आहे. त्यात कसलाही आंतर्विरोध कुरआनच्या वर्णनात उत्पन्न होत नाही. परंतु विविध प्रसंग व वस्तूचे विवरण क्रमांक बदलल्याने जो प्रभाव वाढविण्यासाठी विशेष हेतुने केलेला आहे, काही विशिष्ट परिस्थितीत सामान्य नियम टाळून काही आदेश दिले गेले आहेत, त्यांना विरोधाभास अथवा आंतर्विरोध म्हणता येणार नाही. जगाच्या प्रत्येक कायद्यात आणि व्यवस्थेत 'अपवाद'चे स्थान आहेच. भाषेच्या नियमांतसुद्धा 'अपवाद' पाहायला मिळतो. ही लवचिकता आणि सरलतेचे द्योतक आहे. असे जर नसेल तर कठोरतेचे व विविधतेचे स्वरूप प्राप्त होईल. आंतर्विरोध त्या वेळेला झाला असता जेव्हा त्याचा एक नियम दुसऱ्या नियमाला लागू पडण्यात अडचण आली असती. आंतर्विरोध नसण्याचा अर्थ असा की उद्देश आणि मौलिक नियमांत उलटफेर व्हायला नको. असे कुरआनमध्ये कोठेही आढळत नाही की, एक नियम दुसऱ्या नियमाला निष्क्रिय आणि

अप्रभावी बनवेल. एका गोष्टीला सत्य ठरवून त्याच गोष्टीला दुसऱ्या ठिकाणी खोटे ठरवून देईल, असे कदापि शक्य नाही.

कुरआनात नमुद केले आहे,

"त्या दिवशी कोणत्याही मानव आणि जिन्नला त्याचा गुन्हा विचारण्याची गरज भासणार नाही." *(दिव्य कुरआन - ५५ : ३९)*

याच्या विरुद्ध बऱ्याच ठिकाणी कुरआन ने नमुद केले आहे.

"तर शपथ आहे तुझ्या पालनकर्त्याची आम्ही जरूर त्या सर्वांना विचारू की तुम्ही काय करीत होतात." *(दिव्य कुरआन - १५ : ९२-९३)*

आणि याचप्रमाणे,

"आणि थोडे थांबवा यांना काही विचारावयाचे आहे यांना."

(दिव्य कुरआन - ३७ : २४)

येथे पहिल्या 'आयती'मध्ये प्रलय दिनी अपराध्याला विचारण्याचा नकार दिला आहे, दुसऱ्या आणि तिसऱ्या 'आयती'त विचारपूस करण्याची गोष्ट सांगितली आहे. या दोन्ही बाबतीत विरोध दिसून येत आहे.

याचे समाधान असे होते की जेथे जेथे या 'आयती' आल्या आहेत त्यावेळेच्या प्रसंगाबाबत व त्याच्या मागे-पुढे घडलेल्या प्रसंगाबाबत पूर्ण गोष्ट जाणून घेणे आवश्यक आहे. अभ्यास केल्यानंतर तथ्य समोर येते आणि जाणवणाऱ्याचा विरोध संपुष्टात येतो.

एक समाधान हेच की दोन वेगवेगळ्या प्रसंगी ही गोष्ट सांगितलेली आहे. अपराध्याची चौकशी केल्यानंतर, त्याच्या कर्माचे रेकॉर्ड दाखविल्यानंतर स्पष्ट केले जाईल. मग नंतर त्याला नरकाकडे घेऊन जाताना तो काही विनंती, विनवणी करेल तर त्यावेळी त्याच्या विनवणीवर चौकशी होणार नाही. जसे पुढे कुरआनात नमूद केले आहे,

"गुन्हेगार तेथे आपल्या चेहऱ्यावरून ओळखून घेतले जातील आणि त्यांना कपाळाचे केस आणि पाय धरून फरफटले जाईल." *(दिव्य कुरआन - ५५ : ४१)*

त्यांचे चेहरे स्वतःच साक्ष देतील की ते अपराधी आहेत, तसेच त्यांच्या कर्माची

नोंदही त्यांना अपराधी सिद्ध करीत आहे. आता मात्र त्यांचे गाऱ्हाणे ऐकण्याची गरज नाही. त्यांना आता फरफटत यातनागृहात नेण्यात येत आहे.

दुसरे समाधान असे की विचारल्यावर ते नकार देतील तेव्हा तर अल्लाहच्या विशाल ज्ञानापुढे त्यांचा अपराध सिद्ध झाला असेल. त्याला पुन्हा विचारण्याची गरज नाही. जर विचारणा झालीच तर अपराधींना त्यांच्या अपराधाला स्पष्ट करण्याच्या हेतूने विचारले जाईल. जगात असताना तर 'हिशेबाचा दिवस' ते अमान्य करीत. आता स्वत: पाहिला ना तो दिवस! या फटकाऱ्याने त्या अपराधींच्या यातनेत वाढ होईल. जसे वरील आयतीत आपण पाहिले आहे.

पवित्र कुरआनात एका ठिकाणी म्हटले आहे,

"हे पैगंबर (स.) यांना सांगा, काय तुम्ही त्या ईश्वराशी कुफ्र (द्रोह) करता आणि दुसऱ्यांना त्याचा तुल्यबळ ठरविता ज्याने पृथ्वीला दोन दिवसात बनवून टाकले? तोच तर सर्व जगवासियांचा पालनवर्ता आहे. त्याने (पृथ्वीला अस्तित्त्वांत आणल्या नंतर) वरून तिच्यावर पर्वत रोवले आणि तिच्यांत समृद्धी ठेवली आणि तिच्यांत सर्व मागणाऱ्यांसाठी प्रत्येकाच्या मागणी व गरजेप्रमाणे योग्य अंदाजाने अन्नधान्याची साधने उपलब्ध करून दिली. ही सर्व कामे चार दिवसांत उरकली. मग त्याने आकाशाकडे लक्ष दिले, जे त्यावेळी धुरासमान होते. तेव्हा त्याने दोन दिवसांत आकाश बनवून टाकले." *(दिव्य कुरआन - ४१ : ९-१२)*

कुरआनात अन्य सात ठिकाणी (७:५४, १०:३, ११:७, २५:५९, ३२:४, ५०:३८) असे दाखविले आहे की पृथ्वी, आकाश आणि त्यांच्या दरम्यान जे काही आहे, त्यांची निर्मिती सहा दिवसांत पूर्ण झाली. परंतु वरील 'आयातीत' पृथ्वी दोन दिवसांत, पृथ्वी वरील जीवजंतू, पर्वत इत्यादी चार दिवसांत, नंतर आकाश दोन दिवसांत बनविले. या प्रकारे सृष्टीच्या निर्मितीत आठ दिवस लागले. या गोष्टींत काही मेळ बसत नाही.

दुसरी शंका ही की धरतीची निर्मिती आकाशापूर्वी दाखविली आहे. कुरआन ७९:३० मध्ये आकाश निर्मितीनंतर पृथ्वीनिर्माण, पसरविणे, अंथरण्याची गोष्ट सांगितली आहे. या दोन्ही गोष्टींत विरोधाभास जाणवतो.

शंकेचे निरसन :

या दोन प्रकारच्या शंकांचे निरसन याप्रकारे आहे. वरील 'आयतीत' पृथ्वीच्या निर्माणाचे सविस्तर वर्णन आहे. नंतर संक्षिप्त रूपाने पुनरुक्ती आहे. दोन दिवसांत पृथ्वीच्या निर्मितीनंतर पर्वत, वनस्पती, जीव-जंतू इत्यादींच्या निर्मितीसाठी अतिरिक्त दोन दिवस लागले. एकूण चार दिवस झाले. पृथ्वीच्या निर्मितीनंतर जीव-जंतूसाठी चार दिवस नाही लागले. मग दोन दिवसांत आकाशाची निर्मिती या प्रकारे एकूण चार अधिक दोन असे सहा दिवस झाले.

येथे दिवसाचा अर्थ एक दीर्घकाळ, जसे कुरआनमध्ये स्पष्ट केले आहे ,

" एक अशा दिवसात ज्याचे प्रमाण तुमच्या गणनेनुसार एक हजार वर्ष आहे."

(दिव्य कुरआन , ३२:५)

पृथ्वीची निर्मिती व आकाश निर्मिती यात पहिले काय? याबाबत स्पष्ट उल्लेख नाही. दोन्ही कथनांप्रमाणे असे प्रतीत होते की दोन्हींचे निर्माणकार्य एकत्रित झाले आहे. काही निर्मिती आकाशची व काही निर्मिती धरतीची. जेव्हा एकाच्या निर्मितीची चर्चा सुरू असताना असा अर्थ नाही की दुसरी निर्मिती पूर्ण झाली आहे. जेव्हा कोणी आपले घरकाम सुरू करतो तर जमिनीवर, भिंतीवर, छतावर प्रत्येक भागात थोडे थोडे काम मागे पुढे सुरू राहते, जेवढे निर्माणासाठी जरूरीचे आहे. यावरून निर्माणकार्याची कल्पना केली जाऊ शकते.

एक दुसरा अर्थ असाही होऊ शकतो की मागे-पुढे वर्णन करण्याचा अर्थ असा की निर्माणकार्याकडे लक्ष वेधणे होय. काळाच्या दृष्टिकोनातून पहिले वर्णन केलेले निर्माणकार्य पहिले असेल असे नाही.

एका व्यक्तीने स्वत:चे घर उभारले. नंतर त्याने बंगला बांधला. त्यानंतर विहीर खणली. एका मित्राला आपल्या निर्माणकार्याचा परिचय करून देताना म्हणतो, हे मित्रा! ही पाहा विहीर, तो पाहा बंगला ज्याचे बांधकाम मी करून घेतले आणि ते पाहा एक मोठे घर जे मी माझ्या मिळकतीने उभारले. कोणाचेही सहाय्य लाभलेले नाही.

या वर्णाने त्याचा हेतू फक्त हाच की मोठमोठाली कामे एक-एक करून तुमच्या समोर मांडली. इथे त्याचा हेतू असा नाही की पहिले कोणते काम केले व नंतर काय

केले. पुन्हा मी घर बनविले. याचा अर्थ असा नाही की यापूर्वी वर्णन केलेल्या वस्तूचे निर्माण केल्यानंतर घर बनविले. इथे 'पुन्हा'ने तात्पर्य असे की ''नंतर हेही'' याचप्रकारे कुरआनमध्ये धरतीनंतर आकाशनिर्मितीचा उल्लेख आहे, पण त्याचा अर्थ असा की ज्याप्रमाणे धरतीची निर्मिती अल्लाहने केली आहे. त्याचप्रकारे आकाशाची निर्मितीही अल्लाहने एकटेच केली आहे.

एक असेही मत आहे की, ''आकाशाच्या निर्मितीनंतर धरतीला अंथरणे''चे वर्णन (कुरआन ७९:३०) प्रमाणे असे सिद्ध होत नाही की धरतीच्या निर्मितीचे वर्णन आहे. धरती फार पूर्वी तयार झाली. नंतर हजारों वर्षानंतर पर्वत, समुद्र व सपाटीकरण झाले. धरतीच्या 'अंथरूणा'चा अर्थ असा की भूतल जीवांसाठी उपयोगी होणे होय. म्हणून निर्माणकार्य नंतरचे असे म्हणता येणार नाही.

समाधानासाठी विवरण हे असंभव नाही. म्हणून 'आयती'मध्ये विरोध मानणे आवश्यक नाही.

कुरआन शिकवणीत असहिष्णुता आणि क्रूरता आहे काय?

शंका : पवित्र कुरआनमध्ये कठोरता आणि क्रूरतेची शिकवण मिळते. विरोधकांसाठी कसलीही सहानुभूति आणि सहनशीलता अथवा उदारतेची शिकवण नाही.

जगातील कोणताही ग्रंथ अथवा कोणत्याही व्यक्तीचे व्याख्यान त्यातील संदर्भाला व प्रसंगाला वगळून नवीन संदर्भ व प्रसंग आपल्याकडून टाकून अध्ययन केले तर कधीही त्याचा योग्य अर्थ समजणार नाही. प्रत्येक गोष्टीबाबत मनाप्रमाणे आक्षेप व आरोप ठेवले जाऊ शकतात. कुरआनचा विरोध करणारे लोक आरंभिक काळापासून दुर्व्यवहार करीत व विक्षिप्त प्रदर्शन करीत होते. हे कार्य आजही सुरु आहे व भविष्यातही असे होत राहील, याची खात्री वाटते. याचे निराकरण करण्याकरिता सर्वोत्तम उपाय हा आहे, की एकदा संपूर्ण कुरआनचे अध्ययन केले जावे. म्हणजे आरोपाची वास्तविकता कळेल. कुरआनमधील उदारता आणि कठोरता याचे सर्व संदर्भांचे निरीक्षण केले जावे. वास्तविकता स्पष्टपणे कळेल.

कुरआन अल्लाहचा ग्रंथ आहे. त्याचा हेतू संपूर्ण मानव जातीला मार्गदर्शक व कल्याणकारी आहे. पूर्ण मानवजात अल्लाहच्या परिवारासारखी आहे. त्याने निर्माण केल्याकारणाने त्याला मानवाप्रति प्रेम आणि सहानुभूती आहे. त्याने निर्मित केलेल्या सर्व निर्मिती न्यायावर आधारित आहेत. मग तो स्वत: अन्यायचा वाहक कसा होऊ शकतो?

तुम्ही स्वत: या बाबीवर विचार करावा की न्याय व अन्यायाच्या कल्पनेला काय प्रमाण आहे? मानवाला विचार करण्याचे स्वातंत्र्य आहे म्हणून चांगल्या आणि वाईट मार्गापैकी कोणा एकाचा स्वीकार करावा लागेल. या प्रकारे प्रत्येक काळात आपल्या वागण्याच्या दृष्टिकोनातून काही लोक चांगले असतात, तर काही वाईट. काय समाजाने या दोन्ही प्रकारच्या माणसांना समान दर्जा दिला आहे? दोघांना समान लेखणे म्हणजेच अन्याय होय. वाईट माणसांना त्यांच्या वाईटपणापासून दूर करणे व त्यांना चांगला व हिताचा मार्ग दाखविणे हे माणसाचे कर्तव्य आहे. वाईट माणसे आपल्या आचरणात सुधारणा करीत नसतील तर समाजाला वाचविण्यासाठी त्यांना शिक्षेची, दंडाची तरतूद आहे. न्यायालय व तुरूंगाचे अस्तित्त्व याचकरिता आहे की समाजात न्याय व शांती प्रस्थपित व्हावी.

कुरआनने वाईट लोकांना त्यांची दुष्टता सोडण्यासाठी आणि माणुसकी साधण्यासाठी शिक्षा-दीक्षा, विचार-विनिमय, सुधारासाठी दीर्घकाळ मुदत, क्षमायाचना इत्यादी व्यवस्था केलेल्या आहेत. तरीपण वैयक्तिक व वैचारिक क्षेत्रांत जर ते ऐकत नसतील तर "तुमचा मार्ग मोकळा" म्हणून समाजापासून अलिप्त होण्याची तरतूद आहे, त्यांच्या दुष्टपणाची फळे त्यांना दाखवून दिली की काय लाभदायक आहे व काय हानीहारक. या जगातच निवाडा होण्यापूर्वी त्यांना संधी दिली गेली आहे की त्यांनी त्यांचा कार्यकाळ पुरा करावा. न्यायाचा एक दिवस निश्चित आहे. तेथे त्यांच्या कर्माची फळे व भरपूर बदला मिळेल. याप्रकारे प्रत्येक बाबतीत निपटारा करण्यासाठी कुरआन शिकवण देत आहे. ही सगळी शिकवण सहानशीलतेच्या परिसीमेचे द्योतक आहे.

दुसरा दृष्टिकोन असा की कुरआन या गोष्टीची शिकवण देत आहे की एखादी व्यक्ती अथवा समूह पूर्णपणे वाईट आचरणापासून दूर जात नाही आणि थोडा भलेपणा त्याच्याजवळ आहे तर तेवढ्यापुरताच त्याला सहयोग करावा. त्याला उदारता आणि सहानुभूती नाही तर काय म्हणणार?

कुरआनच्या नजरेत सर्व माणसे समान आहेत. वर्ण, वंश, भाषा, प्रदेश यासारख्या विविध बाबींमुळे मानवाच्या दरम्यान एकता व सहिष्णुतेसाठी बाधक मानीत नाही. परिस्थितीनुसार स्वभाविक गुण दाखवून एका आई-बापाची संतानच्या रूपात परिचय देत परस्पर भाऊ-भाऊ म्हणून जोडले. कोणत्याही व्यक्तीबाबत घृणा, भेदभाव वर्णभेद करणे म्हणजे अपराध होय, असे कुरआन सांगतो. अल्लाहजवळ सर्वश्रेष्ठ तो आहे जो निष्ठावान, प्रार्थना करणारा व अल्लाहचे भय बाळगणारा आहे. जो सदाचारी आहे, दुष्कर्मापासून दूर आहे, दुसऱ्यांच्या हितासाठी आपले सर्वकाही त्याग करतो, चांगल्या कामात सहकार्य करतो आणि लोकांना अडचणींतून काढतो तो अल्लाहला आवडतो. कुरआनचे आदेश सर्वांसाठी व्यापक आहेत. त्यात पक्षपात व संकीर्णता नाही. काही उदाहरणे येथे देण्यात येत आहेत.

"जे कार्य पुण्याईचे व ईशपरायणतेचे आहे त्यामध्ये सर्वांशी सहकार्य करा आणि जी पाप व अत्याचाराची कामे आहेत त्यामध्ये कोणाशीही सहकार्य करू नका."

(दिव्य कुरआन - ५ : २)

"हे पैगंबर (स.)! सांगा हे ग्रंथधारकांनो, ऐका अशा बाबीकडे जी आमच्या आणि तुमच्या दरम्यान समान आहे, हे की आपण अल्लाहशिवाय कोणाचीही भक्ती करू नये, त्याच्याबरोबर कोणासही भागीदार ठरवू नये." *(दिव्य कुरआन - ३ : ६४)*

"धर्माच्या बाबतीत कोणतीही जोर जबरदस्ती नाही सत्य, असत्यापासून वेगळे केले गेले आहे." *(दिव्य कुरआन - २ : २५६)*

"आम्ही त्याला मार्ग दाखविला, मग त्याने कृतज्ञ बनावे अथवा द्रोह करणारा." *(दिव्य कुरआन ७६ : ३)*

"हा तर एक उपदेश आहे. आता ज्याची इच्छा असेल त्याने यापासून धडा घ्यावा." *(दिव्य कुरआन - ७४ : ५४-५५)*

"स्पष्ट सांगून टाका, हे सत्य आहे तुमच्या पालनकर्त्याकडून, आता ज्याची इच्छा असेल मान्य करावे आणि ज्याची इच्छा असेल त्याने नाकारावे."

(दिव्य कुरआन - १८ : २९)

"जो कोणी सत्कृत्ये करील, स्वत:साठीच करील आणि जो वाईट करील तो स्वत: त्याचे दुष्परिणाम भोगेल. नंतर जायचे तर सर्वांना आपल्या पालनकर्त्याकडेच आहे." *(दिव्य कुरआन - ४५ : १५)*

"जर तुझ्या पालनकर्त्याची इच्छा अशी नसती (की पृथ्वी तलावर सर्व ईमानधारक व आज्ञाधारक असावेत.) तर सर्व भूतलवासियांनी श्रद्धा ठेवली असती. मग तू लोकांना भाग पाडशील का की ते ईमानधारक बनतील?"

(दिव्य कुरआन १० : ९९)

टीप : जेव्हा अल्लाहने लोकांना विवश केले नाही तुम्ही कोण विवश करणारे? स्वत:च्या इच्छेने स्वीकारलेली श्रद्धाच (ईमान) लाभदायी आहे. वैचारिक स्वातंत्र्य हीच तर परीक्षा आहे. विवशतेत परीक्षा समाप्त होईल. तेव्हा पुरस्कार अथवा दंड निरर्थक होईल.

कुरआनात अल्लाहने जे युद्धाचे आदेश दिलेले आहेत ते काही वैचारिक मतभेदांसाठी अथवा सांप्रादायिक द्वेषापोटी नाही. धरतीवर पसरलेल्या अत्याचाराविरुद्ध, अशांती व उपद्रवाला समाप्त करण्यासाठी, पीडितांना स्वतंत्र

करण्यासाठी, आतताई दुष्ट लोकांपासून सुटका करण्यासाठी कुरआन मध्ये आले आहे.

"मग काय कारण आहे की तुम्ही अल्लाहच्या मार्गात त्या असहाय पुरुष स्त्रीया आणि मुलांकरिता लढू नये ज्यांचे दुर्बल असल्यामुळे दमन केले गेले आणि धावा करीत आहेत की हे पालनकर्त्यात! आम्हाला या वस्तीतून बाहेर काढ ज्याचे रहिवाशी अत्याचारी आहेत आणि तुझ्याकडून आमचा एखादा वाली व सहाय्यक निर्माण कर."

(दिव्य कुरआन - ४ : ७५)

"आणि तुम्ही अल्लाहच्या मार्गात त्या लोकांशी लढा जे तुमच्याशी लढतात परंतु अतिरेक करू नका. अल्लाहला अतिरेक करणारे आवडत नाही."

(दिव्य कुरआन - २ : १९०)

"काय तुम्ही लढणार नाहीत अशा लोकांशी जे आपल्या प्रतिज्ञा भंग करीत राहिले व ज्यांनी पैगंबराला देशातून काढून टाकण्याचा निश्चय केला होता व अतिरेकास प्रारंभ करणारे तेच होते. तुम्ही त्यांना भिता काय? जर तुम्ही ईमानधारक असाल तर अल्लाह या गोष्टीला जास्त पात्र आहे की तुम्ही त्याची भिती बाळगावी."

(दिव्य कुरआन - ९ : १३)

कुरआनद्वारा प्रस्तावित ही युद्धे ज्या कारणाकरिता लढली गेलीत ती कारणे व सबब महत्त्वपूर्ण होते. मानवाच्या हितासाठी व धरतीवरील बिघाड दूर करण्यासाठी ती युद्धे लढली गेली, ती अभिशाप नव्हती परंतु मानवकल्याणासाठी ती वरदान होती. यामुळेच अल्लाहने जगातील मानवासाठी ती त्याची कृपा व दान ठरविले.

"जर अल्लाह अशा प्रकारे मानवाच्या एका समुदायाला दुसऱ्या समुदायाच्या हस्ते हटवीत नसता तर पृथ्वीची व्यवस्था बिघडली असती. परंतु जगातील लोकांवर अल्लाहची मोठी कृपा आहे की, (अशा तऱ्हेने हिंसाचाराच्या विनाशाची व्यवस्था करीत असतो.)"

(दिव्य कुरआन - २ : २५१)

कुरआनचे असेही आदेश आहेत की, विरोधी मत असणारे शांती भंग करणार नाहीत व अत्याचार करणार नाहीत व मानवी सीमेचे उल्लंघन करणार नाहीत तर अशा लोकांबरोबर मनापासून व मोकळेपणाने कल्याणकारी व्यवहार करावा. निरपराधी लोकांवर अन्याय केला जाऊ नये. आणि मानवाच्या गौरवाचे रक्षण केले जावे.

"अल्लाह तुम्हाला या गोष्टीची मनाई करीत नाही की तुम्ही त्या लोकांशी सद्व्यवहार आणि न्यायाचे वर्तन करावे, ज्यांनी धर्माच्या बाबतीत तुमच्याशी युद्ध केले नाही आणि तुम्हाला तुमच्या घरातून बाहेर काढले नाही. अल्लाह न्याय करणाऱ्यांना पसंत करतो."

(दिव्य कुरआन - ६० : ८)

याप्रकारे कुरआनच्या शिकवणीत सहनशीलता व उदारताबाबत पुष्टी केलेली आढळते. हे नाकारणे म्हणजे दिवसाच्या उजेडाला नाकारणे. उदारतेबाबत कुरआन आधुनिक काळातील सर्व सिद्धांतापेक्षा फार पुढे आहे. जोपर्यंत दुष्ट आणि विरोधी लोकांचे अत्याचार सीमेपलीकडे जाऊन रस्त्याची अडचण होते आणि त्यांची शत्रुता, मालमत्तेचे नुकसान, बेघर करण्यापर्यंत जाते, जेव्हा अशी युद्धजन्य परिस्थिती निर्माण होते, तेव्हा जगातील सर्व विधानांत त्यांच्याविरुद्ध युद्ध पुकारणे व अतिरेक्यांना पायाखाली तुडविण्याचे आदेश दिलेले आहेत. परंतु कुरआनने इथे अशा बिकट परिस्थितीत उपद्रव संपेपर्यंत कार्यवाहीचे आदेश दिलेले आहेत. उपद्रव संपल्यानंतर प्रतिशोध म्हणून वस्तीचा नाश करण्याचे आदेश नाहीत. कुरआनच्या विरोधात असलेल्या लोकांत अशा प्रकारचे सीमेचे पालन केले जात नाही. शत्रुत्त्वाचा अग्नी प्रज्वलित झाल्यानंतर त्यांच्याजवळ न्याय अन्यायची कोणतीही सीमा नाही.

कुरआन अशा प्रकारच्या परिस्थितीत न्यायाचे पालन करण्याचे आदेश व शिकवण देतो. तो सर्वज्ञ अल्लाहच्या प्रकोपापासून लोकांना भयभीत करतो, ते अशासाठी की लोकांनी न्यायसीमेचे उल्लंघन करू नये.

"हे ईमानधारकांनो, अल्लाहसाठी सत्यावर अढळ राहणारे व न्यायाची ग्वाही देणारे बना. एखाद्या गटाच्या शत्रुत्त्वाने तुम्हाला इतके प्रक्षोभित करू नये की तुम्ही न्यायापासून विमुख व्हाल. न्याय करा, हे ईशपरायणतेशी अधिक निकटवर्ती आहे. अल्लाहचे भय बाळगून कार्य करीत रहा. जे काही तुम्ही करता, अल्लाह त्याची पुरेपूर खबर ठेवणारा आहे."

(दिव्य कुरआन ५ : ८)

कुरआनचे दंडविधान क्रूरतापूर्ण आहे काय?

शंका : पवित्र कुरआनमध्ये प्रस्तावित दंडविधान अत्यंत क्रुरूतापूर्ण आणि जंगलयुगातील कायद्याप्रमाणे आहे. मानवसमाजाच्या विकासाबरोबर कायद्यात परिवर्तन व सुधार आलेला आहे. अशात आजही कुरआनच्या त्या कायद्यांना लागू करणे योग्य ठरेल का?

कुरआन मानवसमाजाच्या हिताचा मार्ग प्रशस्त करतो. त्याच्याद्वारे दिल्या गेलेल्या दंडविधानामध्ये मानवप्रकृती आणि समाजकल्याणाचे पुरे पुरे ध्यान ठेवले गेले आहे. कुरआन मुख्यत्त्वेकरून समाजाचा सुधार, विचारपरिवर्तन करून एका सभ्य समाजाची निर्मिती करतो. अपराधी समाजात जन्म घेणाऱ्या पोषक तत्त्वांचा मार्ग बंद करतो. अपराधी घटक व त्याची मूळ कारणे यांचा बंदोबस्त करतो. या कारणास्तव दुष्ट कार्याला प्रोत्साहन देणाऱ्या तत्त्वांची अशी व्यवस्था केली जाते की ते पुढे जाऊ शकत नाहीत. अशी व्यवस्था केली जाते की मानवासमोर अशी विवशता येऊ नये की नैसर्गिक आवश्यकतांच्या पूर्तीसाठी तो अपराधी वृत्तीकडे जाणार नाही. दंडित करणे त्याचे ध्येय नाही. जेव्हा अशी परिस्थिती उत्पन्न होते की आता दंड करणे जरूरीचे आहे तर अशा वेळी इतक्या अटी व शर्ती उपस्थित केल्या जातात की दंड देणे सोपे नसते. हे यासाठी की कोणी अपराध्याला खोटे आरोप व चुकून दंड केला जाऊ नये. दुसरे असे की या अवधीत पश्चात्ताप करून अपराधीला वागणुकीत सुधारणेची संधी मिळावी. बचावाच्या इतक्या संधी मिळूनसुद्धा एखादा अपराधी असे साहस दाखवतो की अपराध सिद्ध झाल्यानंतरही त्याच्यात फरक पडत नाही. मग त्याला अशी शिक्षा देण्यात येते की तिला पाहून दुसरी व्यक्ती तसा अपराध करण्यापासून परावृत्त होते. आता आपण काही उदाहरणे पाहू या.

उदाहरणे :

(१) कुरआनने चोरी करणाऱ्या पुरुष अथवा स्त्रीसाठी दंड म्हणजे मनगटापासून हात कापणे निश्चित केले आहे. (कुरआन ५ : ३८) परंतु दंड लागू करण्यासाठी बऱ्याच अटी व शर्ती लागू आहेत. खाद्य पदार्थ अथवा साधारण, खराब होणाऱ्या बाबीसाठी हे दंड नाही. भुकेने त्रस्त जीवन जगण्यासाठी चोरी करणाऱ्याला हा दंड

करता येणार नाही. खलीफा माननीय उमर (रजि.) यांनी आपल्या शासनकाळात दुष्काळ पडल्यानंतर चोरीसाठी दंड न करणेची घोषणा केली आहे. समाजाच्या लोकांना रोजगार पुरविणे, सरकारी खजिन्यातून आर्थिक मदत देणे, धंद्यासाठी साधन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनकर्त्यावर टाकली आहे. हे याकरिता की समाज आर्थिकदृष्ट्या आनंदी जीवन व्यतीत करू शकेल.

लहान-सहान वस्तूच्या चोरीसाठी ही शिक्षा नाही. त्याकरिता साधारण शिक्षा, दंड होऊ शकतो. एक निश्चित रक्कम ठरवली गेली होती (१० 'दिरहम' चांदीचे मूल्य). एखाद्या व्यक्तीने या व यापेक्षा अधिक रकमेच्या वस्तूची चोरी केली तर त्याचा हात कापला जाईल.

याचप्रकारे जर सरकारी खजिन्यातून चोरी झाली असेल तर चोराचा हात कापला जाणार नाही. सरकारी संपत्ती ही सार्वजनिक मालमत्ता असून समाजाच्या प्रत्येक व्यक्तीचा त्यात हिस्सा आहे. चोरी झालेल्या मालात चोराचाही वाटा आहे, म्हणून त्या अपराधीला या अपराधाबाबत दुसरा दंड दिला जाईल, हात कापला जाणार नाही.

याचप्रकारे असुरक्षित जागेवर चोरी करणाऱ्याला हात कापण्याचा दंड दिला जाणार नाही. कारण मालकाने सुरक्षेसाठी काही व्यवस्था केली नव्हती. सुरक्षा व्यवस्था न करता मालकाने चोरासाठी चोरीची संधी उपलब्ध करून दिली, त्यामुळे चोरीच्या अपराधाची गंभीरता कमी झाली.

चोरीचा अपराध सिद्ध करण्यासाठी साक्ष आणि प्रमाण सुनिश्चित करणे न्यायालयावर अनिवार्य आहे. या साऱ्या शर्ती व अटींबरोबर कठोर दंड यासाठी ठेवले आहेत की समाजात शांती प्रस्थापित व्हावी आणि संकट व भयापासून मुक्ती मिळावी. या दंडाला अनुचित म्हणणे म्हणजे चोर व अपराधीकरिता अनुचित सहानुभूती आहे. यामुळे समाजात गुंडांना वाव मिळतो.

या दंडाच्या कायद्याला असे भयावह करून दाखविले जाते की जसे कोणी एक टाचणी जरी चोरी केली की जल्लाद तलवार हातात घेऊन आणि सोटा हातात घेऊन तयार आहे. तसे काहीही नाही, कारण ऐकून न घेता त्याचा हात कापून त्याला अपंग बनविले जाते. असेच जर सुरू राहिले तर देशात सारेच नागरिक लुळे व पांगळे

होतील. वरील विवरणाबरोबर या काल्पनिक चित्राचे समाधान होऊ शकते.

(२) कुरआनचा दुसरा मोठा दंड अनैतिक संभोगासाठी आहे. आधुनिक युगात भौतिक विकासाबरोबर नैतिक पतनसुद्धा चरमसीमेपर्यंत पोहोचला आहे. आजच्या काळात लपून छपून अथवा मोकळेपणाने मैत्री करणे, एकमेकांच्या इच्छेने अनैतिक संबंध ठेवणे त्या कार्यालयीन मोठ्या कर्मचाऱ्यांचे जणू हे जन्मसिद्ध हक्कच झाले आहे. मनोरंजनाच्या साधनांबरोबर हे कुकर्म जणू जीवनाचे एक अंग झाले आहे. अशा लोकांना कुरआनची शिक्षाप्रणाली जास्त जाणवते.

व्यभिचार हा आमच्या आजच्या समाजाचा कर्करोग झाला आहे. कुरआन या रोगावर कोणत्या प्रकारे कसा हितकारी उपाय करतो, यावर विचार होणे गरजेचे आहे. यावरून आक्षेपांची वास्तविकता समोर येईल.

कुरआनप्रमाणे व्यभिचाराकरिता दंड म्हणजे, भर चौकात शंभर कोडे (चामडी चाबकाचे फटके) ठरवलेले आहे. (कुरआन २४ : २) पुरुष आणि स्त्री या दोघांनी सहमती म्हणून हे दुष्कृत्य केले असेल तर दोघांना समान दंड दिला जाईल. परंतु जी व्यक्ती बळजबरीने दुसऱ्या व्यक्तीला विवश करून त्याच्या इच्छेविरुद्ध हे घृणित कार्य करेल तर फक्त बळजबरी करणाऱ्यालाच दंडित केले जाईल.

जर एखादी व्यक्ती दंडित झाल्यानंतर अथवा त्यापूर्वी वारंवार असे कृत्य करीत असेल व पकडला जात नसेल तर त्याला पकडण्यासाठी शासन बळ प्रयोग करून त्याला दंड देईल.

एखाद्या विवाहित व्यक्तीने व्यभिचाराचा गुन्हा केला असेल तर त्यासाठी खड्डा खोदून त्याला कमरेपर्यंत गाडून त्याच्या भोवती जनसमूह उभा राहून त्याला दगडाने पथराव करून मरेपर्यंत मारावे. मग त्याच्या देहाला काढून सामान्य माणसाप्रमाणे नियमानुसार दफन विधी पार पाडावा.

दंड बंद खोलीत न देता जनतेसमोर दिला जातो कारण की लोकांनी त्यापासून धडा घ्यावा व पुढे हा प्रकार व अपराध आपल्या हातून न घडावा व दुःसाहस होऊ नये.

दंड निश्चितपणे कठोर आहे. हे याकरिता की सदर अपराध समाजासाठी दूरगामी प्रभाव टाकतो. सामाजिक प्रतिष्ठेचे हनन झाल्याने आयुष्यभर स्वतःला

कलंकित समजतो. त्याचबरोबर अवैध संतानकरिता संपत्तीचे अधिकार, सामाजिक नात्याचे अधिकार मोठ्या समस्या निर्माण करतात. हा अपराध समाजाविरुद्ध एक विद्रोह व बंड आहे. नैतिकतेच्या आधाराला पोकळ करणारा आहे. ज्या समाजाचा आधार नैतिक मूल्यांवर आधारित आहे तो समाज या गोष्टीला सहन करणार नाही.

कुरआन समाजाची अशी व्यवस्था करतो की कोणालाही अपराध करण्याची संधी मिळत नाही. फक्त दंडाला अपराध थांबविण्यासाठीचे साधन म्हणून वापरले गेले नाही. कुरआनने अपराध रोखण्यासाठी जी नैतिक आणि सामाजिक व्यवस्था केली आहे, ती जर कोणत्या समाजात लागू नसेल तर दंडही लागू केला जाणार नाही. कुरआनने पहिल्या अपराधाच्या दाराला भक्कम तऱ्हेने बंद केले आहे. कारण कोणासाठी अपराध करणे सोपे नसावे. तरीपण कोणी कठीण श्रमाने सुरक्षेची भिंत तोडून अपराध करणार असेल तर भयानक दंडाची शिक्षा भोगावयास तयार असले पाहिजे.

व्यभिचारापासून समाजाला मुक्त करण्यापासून प्रत्येक तरूण पुरुष व तरूणीना लग्नाची प्रेरणा दिली गेली पाहिजे. जर कोणी साधनाअभावी लग्न करण्यास सक्षम नाही तर त्याला सक्षम बनविणे व लग्न करण्याची जबाबदारी समाज आणि शासनकर्त्यांवर टाकण्यात आलेली आहे.

तुमच्यापैकी जे लोक अविवाहित असतील आणि तुमच्या दास-दासींपैकी जे सदाचारी असतील त्यांचे विवाह करून द्या. जर ते गरीब असतील तर अल्लाह त्यांना आपल्या कृपेने श्रीमंत बनवील. अल्लाह विशाल आणि सर्वज्ञ आहे.

(दिव्य कुरआन - २४ : ३२)

विधवा आणि तलाकपीडित महिला आणि पत्नीरहित पुरुषांसाठी अनिवार्य आहे की त्यांनी लवकरात लवकर लग्नाची व्यवस्था करावी. काही परिस्थितीत पुरुषांना एकाहून जास्त लग्न करण्याचे अधिकार दिलेले आहेत की त्यामुळे व्यभिचाराला आळा बसेल. कुरआनच्या दृष्टिकोनातून ब्रह्मचर्य धारण करणे एक अपराध मानला गेला आहे. कारण असे करून मनुष्य आपल्या आत्म्याला व शरीराला कष्ट देत असतो. चोरवाटेने आपल्या गरजेची पूर्तता माणूस करतो. दुश्चारित्र्याचे घातक बी समाजात पेरतो, आपल्या प्रकृतीविरुद्ध तो संघर्ष करतो आणि शेवटी स्वत: पराभूत होतो.

समाजात स्त्रियांना पडदा करण्याचे आदेश देऊन व्यभिचाराच्या मुख्य

दरवाजावर पहारा बसवून दिला आहे. स्त्रीचे रूप व सौंदर्यदर्शन हे पहिले पाऊल असून व्यभिचारापर्यंत पोहचण्याचे कारण होय.

कायद्याचे दुरूपयोग होऊ नये म्हणून दंड करणेसाठीची अट निश्चित केली गेली आहे की संभोगाची क्रिया प्रत्यक्ष पाहणारे चार साक्षी हजर असावे.''

''आणि जे लोक मर्यादाशील स्त्रियांवर आळ घेत असतील मग चार साक्षीदार घेऊन येत नसतील, त्यांना ऐंशी फटके मारा आणि त्यांच्या साक्षी कधी स्वीकारू नका, आणि ते स्वत:च अवज्ञाकारी आहेत.'' *(दिव्य कुरआन - २४ : ४)*

साक्षीदार विश्वसनीय असावेत जे शपथपूर्व या गोष्टीबाबत साक्ष देतील की त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी अमुक व्यक्तीला अमुक वेळी व अमुक स्थळी हे कर्म करताना पाहिले आहे. नंतर साक्षीदाराचे कथन आणि परिस्थितीचे अवलोकन करून घटनेबाबत विचारणा केली जाईल. अपराध सिद्ध झाल्यानंतर दंडात्मक कार्यवाही केली जाईल. यावरून अंदाज बांधता येईल की कोणावर अपराध सिद्ध करणे किती कठीण गोष्ट आहे व दंड देणे भाग पाडणेही कठीण आहे. तो कसा उदंड आणि कलुषित व्यक्ती असेल जो लग्नाचा सोपा व सरळ मार्ग न स्वीकारता अशी उदंडता करेल.

व्यभिचाराचादंड काही वर्षांत एखाद्या वेळेस येतो. परंतु दुष्प्रचार करणारे याप्रमाणे कथन करतात की रोज दंडित होणाऱ्यांची संख्या वाढत असते. वैध मार्गाने आवश्यकतापूर्तीचे सुलभ मार्ग उघडे असताना, जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात नैतिकतेची मजबूत पकड असल्याने कोणी वाईट मार्गावर जाणार नाही. काही दुष्ट लोक आणि वाईट प्रवृत्तीचे लोक न्यायाच्या अटी व शर्ती पूर्ण न झाल्याने अपराधी असूनसुद्धा वाचवू शकतात, कारण दंड हा अंधाधुंद दिला जात नाही. त्या दुष्ट लोकांपैकी ९९% दंडाच्या भीतीने आचरण सुधारण्यासाठी विवश होतात. याप्रकारे जणूकाही पूर्ण समाज या दुष्ट कर्मापासून प्रावृत्त होतो आणि दंडापासून मुक्त होतो.

न्यायिक पकडीपासून लपून दुष्ट कार्य करणाऱ्याना दंड न मिळण्याचा अर्थ असा नाही की त्यांना सूट मिळते. त्यांना हा कठोर दंड तर दिला जाऊ शकत नाही. परंतु सामाजिक व्यवस्थेअंतर्गत नियमांचे उल्लंघन केल्यामुळे संदेहाच्या क्षेत्रात आल्यावर त्यांना ताकीद दिली जाईल, प्रताडित केले जाईल. गरज पडल्यास एखाददुसरा लहान दंडही दिला जाऊ शकतो. ज्यामुळे तो इसम संदिग्ध आचरणापासून लांब राहील.

सामाजिक स्वरूपाची ही प्रक्रिया चालू राहील, इथपर्यंत की एक तर सुधार होईल नाही त दंडांपैकी कोणता एक दंड त्याला स्वीकार करावा लागेल.

या अपराधाच्या दंडात सवलत देऊन आधुनिक समाज-सुधारकांनी मानवतेव काही उपकार केले नाहीत. एका अपराध्याबाबत सहिष्णुतेने किती नारींची अब्रु घेतल हे सर्वांना माहीत आहे. एकीकडे तर न्यायानुसार परस्पर सहमतीने केलेल्य व्यभिचाराला अपराधापासून अलग केले आहे. हाच अपराध सहमतीने केला तर त वैध, कायदेशीर ठरतो आणि बळजबरीने बलात्कार हा अपराध गणला जातो व्यभिचारांसाठी उत्तेजित करणाऱ्या गोष्टींचा प्रचार उघड उघड केला जात आहे मनोरंजन म्हणून विवस्त्र नाच, सिनेमा, टी.वी. फॅशनची विपूल साधणे, सौंदर्य स्पर्धा, वयस्क विद्यार्थी-विद्यार्थिनीकरिता सहशिक्षण, जीवनातल्या प्रत्येक क्षेत्रात अपरिचित पुरुष आणि स्त्रियांचे एकत्र काम करण्याची संधी, पडदा न करणे, नसबंदी, गर्भनिरोधक साधने व औषधी इत्यादी व्यभिचाराला खुले निमंत्रण उपलब्ध करून देते. अशा स्थितीत साधारण सदाचारी व्यक्तीला ही व्यभिचारची प्रेरणा का नाही मिळणार? हेच कारण आहे की समाजाचा एक मोठा वर्ग या अपराधाच्या कक्षेत आला आहे. यामुळे निरनिराळे आजार, सामाजिक भांडणे व कलह, पैशांचा दुरुपयोग, पारिवारिक संबंधांचा विनाश, अपहरण, बलात्कार आणि मानवहत्येच्या घटना घडत असतात. हे सर्व रोग अतिशय वेगाने समाजाचा नैतिक विनाश करीत आहेत.

एकीकडे व्यभिचाराला प्रोत्साहन म्हणून त्याची साधने प्रचारासाठी कायद्याच्या सावलीत वाढत आहेत, विकसित होत आहेत. दुसरीकडे नारी-सुरक्षा कायदा, महिला आयोग, अपराधावर नियंत्रण मिळविणारे कायदे, कडक दंड देण्याची घोषणा आदींचे जाहीर दर्शन घडविले जाते. एकीकडे आग लावली जाते, ज्यामुळे घर जळून राखरांगोळी होते, तर दुसरीकडे विहीर खणली जाते की घराची आग विझवावी. कशी विडंबणा आहे? काय आधुनिकीकरणाच्या नशेत उन्मत्त लोकांच्या अकलेवर पडदा पडला आहे?[१]

(३) याचप्रकारे देशात विद्रोह करणे, शांती भंग करण्यासाठी कुरआनात अशा

१. बलात्काराची प्रकरणे आमच्या देशात आणि देशाच्या राजधानी दिल्लीत इतकी वाढली आहेत की आता भारत सरकार या अपराध्यांना मृत्यूदंड देण्याचा विचार करीत आहे.

लोकांना देशातून हाकलून लावणे, फाशी देणे अथवा हात-पाय कापून दंड देणे निश्चित केले आहे. हा दंड जनसमुदायासमोर दिला जातो कारण इतरांनी हे दुष्कृत्य करू नये. शांतीभंग आणि देशद्रोहाच्या अपराध्यांना आज सर्व राष्ट्रे कठोर दंड करतात. कुरआनद्वारा प्रस्तावित दंडाबाबत लोक नावे ठेवतात, त्यांच्या कैदखान्यात कितीतरी अमानवी यातना दिल्या जात आहेत. त्यावर कोणी बोलायला तयार नाही.

काही कथित अपराधी या यातनागृहांत कैदी आहेत की अपराध्यांच्या अपराधाची साक्ष नाही, प्रमाण नाही. फक्त आरोप सोडून तपास न करता अमानवी यातना दिल्या जातात. विजेचे शॉक देणे, बर्फाचे पाणी व उकळते पाणी शरीरावर टाकणे, उलटे लटकून धूर देणे, गुदद्वार मार्गे पाणी टाकणे, तोंडावाटे पाणी काढणे, त्वचेवर सिगारेटचे चटके लावणे, आलेले फोड फोडून काढणे, त्वचेवर जखम करणे, नख काढणे, डोळे काढणे इत्यादी यातना अशा आहेत की त्या असभ्य माणसांनासुद्धा माहीत नाहीत. आज सभ्य आणि मानवतावादी, आधुनिक युगात हे सर्व पडद्यामागून करीत आहेत, तरीपण ते मानवतावादी आहेत. ते जर सत्तेवर आले तर देशाच्या अस्मितेला विकतील, लाच घेतील, छल-कपट करून पैसे खातील. जनतेला लुबाडतील गोदामांत अन्नधान्याचा साठा दाबून ठेवून लोकांना उपाशी मारतील आणि देशभक्त म्हणून मिरवतील. त्यांना सर्वकाही माफ आहे. त्यांच्या कार्यपद्धतीत मोठाले अपराध घडतात आणि त्यांना कुणी दंड करण्याचे इच्छिले तरी या जगात शक्य नाही.

कुरआनने शांती स्थापण्यासाठी आणि देशाच्या समृद्धीसाठी कायदे केलेले आहेत व त्यांचे उल्लंघन करणारा कोणीही व्यक्ती अपराध सिद्ध झाल्यावर दंडास पात्र राहील. परंतु आजच्या परिस्थितीत धन व सत्ता शक्तीधारक व्यक्तींना दंड देण्याची ताकद कुणात नाही. सत्तेच्या बाहेरील व्यक्ती जर सत्तेचा विरोधक असेल तर त्यावर देशद्रोहाचा दोषारोप ठेवला जातो. त्याच्यावर मात करण्यासाठी बनवलेल्या कायद्यालापण पायी तुडविले जाते.

(४) मानवाच्या जिवाचे व शरीराचे महत्त्व सर्वांना समान आहे. विनाकारण मग ती व्यक्ती कितीही प्रतिष्ठित व मोठी असो दुसऱ्या व्यक्तीच्या शरीराचा अंश नष्ट करत असेल तर दंड म्हणून त्याच्या शरीराचा तोच भाग नष्ट केला जाईल. तो कोणाचा जीव घेत असेल तर त्याचा जीव घेतला जाईल. हाताबद्दल हात, पायाबद्दल पाय,

डोळ्याबद्दल डोळा, नाकाबद्दल नाक, कानाबद्दल कान याचप्रमाणे प्राणाबद्दल प्राण, हे नियम कुरआनने प्रस्तावित केले आहेत. परंतु या नियमांना दुसरा पर्याय पण दिलेला आहे. अवयस्कर, वेडा (डोके फिरलेला), विना उद्देश, चुकून अशा प्रकारचे शारीरिक नुकसान झाल्यास नुकसान करणाऱ्याकडून दंडाचा बदला म्हणून दुसऱ्या प्रकारचा आर्थिक दंड, कैद इ. शिक्षा दिली जाईल. नुकसान झालेल्या पक्षाच्या वतीने अपराध्याला क्षमा करता आली तर त्या स्वरूपात रक्कम घेऊन माफ करता येईल. अशा परिस्थितीत न्यायालय अपराध्याला दंड करू शकणार नाही.

या कायद्याला रद्द करून दुसरा दंड प्रस्तावित केला गेला आहे तो मानवी जीवनाच्या रक्षणार्थ समर्थ नाही. आज मानवाच्या जीवाचे मूल्यच उरले नाही. सगळीकडे मार-काट, कत्तल हे गाजर-मुळ्यासारखे झाले आहे. माणसाचे अवयव काढून विकले जात आहेत. शरीराच्या अवयवाच्या खरेदी-विक्रीचा धंदा सुरू आहे. कुरआनची शिक्षा लागू केल्यास या दुष्प्रवृत्तीवर अंकुश लावला जाऊ शकतो.

कुरआनने मानव जीवनाचे महत्त्व व प्रतिष्ठा पटवून दिली आहे. त्यामुळे जीवनाचे रक्षण करण्याचे उपाय ही अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. कुरआनानुसार,

"ज्याने एखाद्या माणसाला खुनाबद्दल अथवा पृथ्वीतलावर उपद्रव पसरविण्याव्यतिरिक्त अन्य कारणाने ठार केले तर त्याने जणू काही सर्व मानवांना ठार केले. आणि ज्याने कोणाला जीवनदान दिले त्याने जणू काही सर्व मानवजातीला जीवन प्रदान केले." *(दिव्य कुरआन - ५ : ३२)*

या नियमाचे पालन पूर्ण मानवसमाजात सामूहिकरित्या होत असेल आणि कुणी बिनडोक याची अवहेलना करणार नसेल तर प्राणाऐवजी प्राण अर्थात खुन्याची हत्या करण्याची शिक्षा कुरआनने निर्धारित केली आहे.

हे याकरिता आहे की मानवी जीवाचा सन्मान व्हावा. दूसरी कोणतीही शिक्षा ठार मारणाऱ्याला या जघन्य अपराधापासून रोखू शकत नाही. आज जगात हत्या करण्याचा बाजार फोफावत आहे. माणसाचे रक्त पाण्याहून स्वस्त झाले आहे. याचे कारण हेच आहे की हत्येसारख्या अपराधाची समुचित शिक्षा देण्याची व्यवस्था केली गेली नाही. मेलेल्या माणसाबाबत सहानुभूती न दाखवता हत्याऱ्याची बाजू धरून सहानुभूती

दर्शविली जाते. मृत्यूदंडाला अमानवी म्हटले जाते. जर आजही जगात हत्या आणि विनाशाला थांबवायचे असेल तर कुरआनने दिलेल्या एकमात्र शिक्षेचा आदेश पाळावा लागेल. निष्पक्ष भावनेने विचार केला तर एका साधारण व्यक्तीच्या बुद्धीत ही गोष्ट सहजपणे मावेल की जीवनरक्षेला सुनिश्चित करण्यासाठी मारणाऱ्याला मृत्यूदंड मिळालाच पाहिजे. दुसरा कोणताही मापदंड जीवन सुरक्षेसाठी नाही.

कधीकधी हत्येचे काहीच कारण नसते. हत्या केल्यानंतर हत्याऱ्याला पश्चात्ताप व्हावा असेही परिवर्तन होते व त्यामुळे हत्या झालेल्या व्यक्तीच्या परिवाराबरोबर चांगले संबंध प्रस्थापित करेल व आपल्या अपराधाबद्दल मोठी रक्कम प्रायश्चित्त रूपाने देऊन आपल्या आयुष्याला वळण लावेल. हत्याऱ्याला दंड झाल्यानंतर मृतकाच्या परिवाराला काही लाभ प्राप्त होत नाही. अशा स्थितीत मृतक व्यक्तीच्या नातेवाईकांना त्यांच्या सहमतीने नियत राशी देऊन त्यांना सहमत करून घ्यावे. मृतकाचे नातेवाईक परिस्थितीला अनुसरून निर्णय घ्यायला स्वतंत्र आहेत. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे दडपण राहणार नाही. त्यांच्या सहमतीने क्षमा करण्याची प्रार्थना न्यायालयात दंड न करता मान्य करून अपराध्याला सोडू शकते.

हत्यारा जर मोठा अपराधी आहे. शत्रुत्त्वाच्या भावनेने हत्या केल्यानंतरही मृतकाचे नातेवाईक स्वत: त्याचा जीव सोडणार नाहीत. ते त्याला काही उचित कारणे असतील तरच अपराधीला क्षमा करतील. अशा स्थितीत या कायद्याला अमानवी म्हटले जाणार नाही.

कुरआनच्या व्याख्येचे अधिकार कोणाला?

शंका : पवित्र कुरआनची व्याख्या अथवा स्पष्टीकरणाचा अधिकार फक्त मुस्लिम विद्वानांनाच आहे? मुस्लिमेतर विद्वानांना हा अधिकार का नाही?

कोणत्याही समस्याचे समाधान दोन प्रकारे होते. पहिला सैद्धान्तिक आणि दुसरा व्यावहारिक. दोघांच्या दरम्यान सामंजस्य आणि सुसंगती नसेल तर त्यात क्रियाशीलता येऊ शकत नाही.

जर असे निश्चित केले की विशिष्ट समूह अथवा समुदायाला एखाद्या ग्रंथाला वाचणे, समजणे किंवा व्याख्या करण्याचा अधिकार आहे व इतर लोकांना असा अधिकार नाही तर हे अन्यायकारक होईल. व्यवहारात त्याचे असे दुष्परिणाम समोर येतील जसे वेदांच्या बाबतीत जगाने पाहिले आहे. असे विशिष्ट अधिकारप्राप्त समूह ग्रंथांत परिवर्तन करेल आणि त्याची मनमानी व्याख्या करेल आणि दुसरे लोक त्यांची निंदा करतील. यामुळे दोन्ही बाजुंनी अनर्थ होईल. ग्रंथ आपल्या विषयाबाबत काहीही स्पष्ट न केल्याने लुप्त होईल.

याच्या विरुद्ध व्यावहारिकपणे प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य दिले जावे की त्याने कोणत्याही पुस्तकाचे विश्लेषण करावे आणि त्याला मान्यताही मिळाली तर अशा परिस्थितीत प्रत्येक माणसाच्या मताप्रमाणे विश्लेषणाने ग्रंथ विकृत होईल. ज्या माणसाने एखाद्या ग्रंथांची व्याख्या योग्यता नसतांना केली व आपल्या मताप्रमाणे मान्य करण्याचा हट्ट धरून बसला तर ते योग्य होणार नाही. त्यामुळे विसंगती निर्माण होणे स्वाभाविक आहे.

जगात कोणत्याही विषयाच्या पुस्तकाची उचित व्याख्या आणि अर्थ निश्चित करण्याचे कार्य त्या विषयाचे जाणकार आणि उच्चस्तर योग्यता धारण करणाऱ्यालाच सोपविले जाते. त्याच्याच कार्याला मान्यता दिली जाते. हे एक सार्वभौमिक सत्य आहे आणि असेच व्हायला पाहिजे. वैद्यकीय आणि चिकित्सा विज्ञानाच्या एका पुस्तकाचे विश्लेषण करण्याचा हक्क त्याच व्यक्तीला आहे जी त्या विषयात पारंगत आहे. ज्या व्यक्तीचा तो विषय नाही त्याने विश्लेषण करू नये. तसे करण्याचा त्याला अधिकार नाही. तर मग हा नियम व सिद्धान्त कुरआनच्या बाबतीत का लागू करू नये? मग अशी अपेक्षा का ठेवावी की जी व्यक्ती 'कुरआन'चे उचित ज्ञान न ठेवता, त्याची भाषा

ा विद्या न जाणता विश्लेषण करण्याचा अधिकार कशी प्राप्त करू शकते? कुरआनच्या ज्ञानाचा अभाव असलेल्या मुस्लिमालाही विश्लेषण करण्याचा अधिकार ाही. मग तो दुसऱ्या विषयांत कितीही पारंगत का असेना! हे प्रतिबंध सर्वांसाठी आहे.

काही लोकांनी असा भ्रम पसरून ठेवला आहे की कुरआन समजण्यासाठी चा अधिकार धार्मिक अधिकारी अथवा समूहालाच आहे. याचे कारण असे की काही ्यायालयात न्यायधीशांनी मुस्लिमांच्या खाजगी धार्मिक विषयांत असे काही निर्णय दिले े कुरआनच्या नियमानुसार नव्हते. तरीपण त्याला कुरआननुसार सिद्ध करण्याचे प्रयत्न ेले गेले. येथूनच भ्रम पसरविण्याचे काम सुरू झाले. अशा बऱ्याच घटना मुस्लिमांच्याही ाहेत ज्यात चुकीच्या निर्णयाला मान्यता मिळाली नाही. काही अज्ञानी लोकांनी ुरआनची चुकीची व्याख्या करून मनाप्रमाणे फायदे घेण्याचे प्रयत्न केले आहेत. त्यांच्या ा कृत्याला विद्वानांनी अमान्य केले आणि त्यांचा विरोध केला. जरी एखाद्या विद्वानाने ासे कृत्य केले असले तरी 'अमान्य' म्हणून घोषित केले असते. कुरआन कोणा ुस्लिमाला अथवा धर्माधिकाऱ्याला आपली मनमानी कार्यवाही करण्याचा अधिकार देत ाही.

कुरआन शिकणे, समजणे व विश्लेषण करण्यासाठी मुस्लिम आणि मुस्लिमेतर ी अट नाही तर ज्ञान आणि योग्यता ही कसोटी आहे. त्या आधारे एखाद्याचे मत ्वीकारले जाते. अशाच पद्धतीने चुकीच्या विचारांच्या चुकीच्या आधारे सिद्ध केलेली ोष्ट अस्विकृत केली जाते.

काळाच्या विषम परिस्थितीत कुरआनद्वारा अवैध केलेल्या काही गोष्टींना वैध करण्याकरिता काही 'उदारतावादी', 'नव्या दृष्टी'चे समर्थक मग ते कोणीही असोत ्रयत्नशील असून कुरआनची पराधीनता मान्य करीत नाहीत. याचे स्पष्ट उदाहरण आहे ादिरेला आणि व्याजाला वैध करण्याचे प्रयत्न होय. कुरआनने दोन्ही गोष्टींना घृणित आणि अवैध घोषित केले आहे.

जगातील कोणतेही कायदे एका विशिष्ट समाजासाठी निर्मित केले जातात. ज्यूंचे ेच कायदे दुसऱ्या समाजासाठी लागू केले तर ते अप्रासंगिक होतात. हे नियम सर्वांग ूपाने निर्मित होतात, हे सगळे एकत्र होतात. दुसऱ्या नियमावर आधारित समाजात

अंशिक रूपाने बाहेरचे नियम लागू केल्याने विसंगती निर्माण होते. उदाहरणार्थ कम्युनिष्ट समाजात काही नियम भांडवलशाहीचे आणि इस्लामी समाजाचे काय अनुरूप होऊ शकत नाहीत. याचप्रकारे राजतंत्रात प्रजातंत्राचे काही नियम लागू पड नाहीत.

ज्याप्रकारे एका मोटारीचे सर्व भाग पूर्ण मशीनच्या गरजेनुसार बनविले जाता आणि ते योग्य तऱ्हेने बसविले जातात. तसेच विमानातील यंत्रसामुग्री त्याच्य गरजेप्रमाणे बनवलेली असते. मोटारयंत्राचा एक भाग विमानयंत्रात बसणार नाही कारण ते त्यासाठी बनविले गेले नाही. जो पार्ट ज्याकरिता बनविला आहे तेथेच योग्य तऱ्हेने बसेल व काम करेल. ठीक अशाच तऱ्हेने इस्लामेतर समाजात इस्लामी कायद लागू करणे उपयोगी पडणार नाही. या अडचणीवर मात करण्यासाठी लोक नियमांन उलट-सुलट करून मनाप्रमाणे व्याख्या करून आपले ध्येय साध्य करण्याचे प्रयत्न करतात.

समाजातील विकृती दूर करणे व समाजात परिवर्तन आणणे मनुष्याचे कर्तव् आहे. ईशविधानालाच परिवर्तीत करणे हा उपाय नाही.

कुरआन ईशविधान आहे व त्यात प्रत्येक युगातील मानवसमाजाचे मार्गदर्श करण्याची क्षमता आहे. यामुळे विषम समाजात विकृत करून लागू केल्याने ते दूषि होईल व अस्ताव्यस्त होईल. ईशग्रंथ असल्याकारणाने मानवाला त्यात परिवर्त करण्याचे अधिकारही नाहीत. परंतु चुकीचे अर्थ लावणाऱ्यांना नैतिक विरोध व वैधानिक विरोध करणे उचित आहे. अशा स्थितीत मुस्लिम समाजाला अंधविश्वासू संकीर्णतावादी आणि रूढीवादी अशी नावे ठेवणे अनुचित आणि अन्यायकारक आहे ही एक नवीन प्रकारची शिवी आहे जी खरेपणावर, प्रामाणिकपणावर दृढ राहणाऱ्यांसाठी बनविली गेली आहे.

- समाप्त -